सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २४ जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## भंडाऱ्यातील ऑर्डिनेन्स फॅक्टरीत मोठा स्फोट

### सात कामगारांचा मृत्यू, अनेक जण मलब्याखाली अडकले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४भंडारा**

भंडारा जिल्ह्यातील जवाहर नगर आयुध निर्माणीमध्ये मोठा स्फोट झाला आहे. ही घटना एलटीपी प्लांट मध्ये सकाळी सव्वा नऊ वाजता च्या दरम्यान घडली. एक इमारत पूर्णतः उडाली असून कामगार दगावल्याची माहिती आहे. सात कामगार दगावल्याची माहिती असून आकडा वाढण्याची शक्यता आहे. इमारतीच्या मलाब्याखाली काही मृतदेह अडकले असून



काही जखमी सुद्धा अडकून पडले आहेत. त्यांना बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. दरम्यान जिल्हा नियंत्रण कक्षाने दिलेल्या माहितीनुसार आयुध निर्माणी जवाहर नगर येथे शुक्रवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास एक स्फ़ोट झालेला असून त्यामध्ये काही काम करणारे कर्मचारी हे गंभीर स्वरूपात जखमी झाले असल्याची प्राथमिक माहिती प्राप्त झाली आहे. एसडीआरएफ यांना पाचरण करण्यात आले आहे.

जवाहरनगर येथील आयुध निर्माणी कंपनीत (ऑर्डीनेस फॅक्टरी) २७ जानेवारी २०२४ मध्ये भीषण स्फोट झाला होता. त्यातएक कर्मचारी ठार झाला होता. कंपनीतील सी एक्स विभागात हा स्फोट झाला होता.

## ठाकरेंच्या शिवसेनेचे अरविंद सावंत, एमआयएमचे असदुद्दीन ओवेसी यांच्यासह १० खासदार निलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नवी दिल्ली**

वक्फ सुधारणा विधेयक जेपीसी अर्थात संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आलेले आहे. या समितीच्या गेल्या काही महिन्यांपासून बैठक सुरू आहेत. शुक्रवारी झालेल्या बैठकीत प्रचंड गोंधळ झाला. यात विरोधी बाकावरील १० खासदारांना निलंबित करण्यात आले. यात ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार अरविंद सावंत, एमआयएमचे असदुद्दीने ओवेसी यांचाही समावेश आहे.



वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकावर शुक्रवारी (२४ जानेवारी) संयुक्त संसदीय समितीची बैठक झाली. सुधारणा विधेयकाच्या मसुद्याचा अभ्यास करण्यासाठी विरोधी खासदारांना पुरेसा वेळ दिला जात नाहीये, या मुद्द्यावरून वाद सुरू झाला. भाजपचे खासदार जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखालील होत असलेल्या समितीच्या बैठकीत काश्मिरचे मीरवाईज उमर फारूकी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाचे म्हणणं ऐकून घेतलं जाणार होतं. पण, त्यापूर्वीच विरोधी पक्षाच्या खासदारांनी आक्षेप घेतला.

विरोधी पक्षाच्या खासदारांनी आरोप केला की, दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप वक्फ सुधारणा विधेयकावरील अहवाल तातडीने मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहे. सत्ताधारी आणि विरोधी खासदारांमध्ये वादविवाद सुरू झाला. तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी, काँग्रेसचे सय्यद नासिर हुसैन हे बैठकीवर बहिष्कार टाकत निघून गेले. विरोधी पक्षाच्या खासदारांनी गोंधळ घालण्यास सुरूवात केल्यानंतर अध्यक्षांनी दहा खासदारांना एका दिवसासाठी निलंबित केले.

**कोणत्या खासदारांचं निलंबन?**

कल्याण बॅनर्जी, मोहम्मद जावेद, ए. राजा, असदुद्दीन ओवेसी, नासिर हुसैन, मोहीबुल्लाह, मोहम्मद अब्दुला, अरविंद सावंत, नदीम उल हक आणि इमरान मसूद यांना एका दिवसासाठी निलंबित करण्यात आले.

## अमरावतीत बांगलादेशी रोहिंग्याना आश्रय दिला जातो

### भाजप खासदार अनिल बोंडे यांचा खळबळजनक आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

अमरावतीत बांगलादेशी रोहिंग यांना आश्रय दिला जातो, असा खळबळजनक आरोप भाजपचे खासदार अनिल बोंडे यांनी केला आहे. त्यांच्या या आरोपामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. त्यामुळे अमरावतीत आश्रयित असलेल्या बांगलादेशीना शोधून काढण्याचे एक मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे. अमरावती म्हणजे प्रयोगशाळा करून टाकली आहे. मागे ज्यावेळी दंगलीची परिस्थिती निर्माण झाली होती त्यावेळी इथे बांगलादेशी यांना आश्रय दिला जात असल्याचा देखील स्पष्ट केलं होतं. पोलीस



आयुक्तांना या संदर्भात पत्र देत कारवाई करण्याची मागणी केली असल्याची माहिती डॉ.बोंडे यांनी दिली आहे. अमरावतीत आश्रयित असलेले बांगलादेशी रोहिंग्या की पश्चिम बंगालचे रहिवासी याबद्दल संभ्रम निर्माण झाला होता. भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी बनावट जन्म दाखल्याच प्रकरण बाहेर काढलं. त्यावेळी सर्वजण जागरूक झाले आहेत. औद्योगिक वसाहतीत बांगला बोलणारे नागरिक आहेत. त्यामधील अनेक जणांची कागदपत्र ही संशयास्पद आहेत. ते बांगलादेशातून आले असल्याचे महाराष्ट्रात आता जाहीर झालं आहे. सैफ अली खान फतोडी याच्यावर हल्ला करणारा देखील बांगलादेशी आहे. त्यामुळे या बांगलादेशीवर कडक कारवाई करण्याची मोहीम सरकारने हाती घेतली आहे असे देखील बोंडे यांनी स्पष्ट केले आहे.

## अमित शहांवरील संस्कार कोल्हापूरचे वाटत नाहीत : शरद पवार

### म्हणाले – देशाच्या गृहमंत्र्यांनी तारतम्य ठेवून भाष्य करणे अपेक्षित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४कोल्हापूर**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर शरद पवार यांनी जोरदार हल्ला चढवला आहे. अमित शहा यांचे बोलणे अतिशय अतिटोकाचे असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर ते कोल्हापूरला शिकले आहेत. मात्र त्यांचे बोलणे ऐकून हे काही कोल्हापूरचे संस्कार वाटत नाही असे देखील शरद पवार यांनी म्हटले आहे. अमित शहा यांच्यावर टीका करताना त्यांच्यावरील संस्काराचा उल्लेख पवार यांनी केला आहे. ते कोल्हापूर येथे पत्रकारांशी बोलत होते.



अमित शहा हे सातत्याने जे काही बोलतात त्याची नोंद महाराष्ट्रातील विरोधी पक्षातील नेत्यांनी सातत्याने घेतली आहे. अमित शहा आणि त्यांचा बोलण्याचा टोन हा अति टोकाचा असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. देशाच्या गृहमंत्र्यांनी अधिक तारतम्य ठेवून भाष्य करणे अपेक्षित असल्याचे शरद पवार म्हणाले. खरे म्हणले हे काही कोल्हापूरचे संस्कार वाटत नाही. अमित शहा हे कोल्हापूरला शिकले की कुठे शिकले हे मला माहिती नसल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. या माध्यमातून अमित शहा यांच्यावर पवारांनी जोरदार हल्ला चढवला.

**ठाकरेंचे पदाधिकारी पक्ष सोडणार नाहीत**

उद्धव ठाकरे यांनी कालच्या मेळाव्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत मौन बाळगले असल्याचे पाहायला मिळाले होते. यावर देखील पत्रकारांनी शरद पवार यांना प्रश्न विचारला होता. उद्धव ठाकरे हे पुन्हा एकदा भाजपसोबत जाणार असल्याच्या चर्चा सुरु आहेत. यात तथ्य वाटते का? असा प्रश्नही पवारांना विचारण्यात आला होता. मात्र मला तसे वाटत नसल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. यावेळी त्यांनी अमित शहा यांच्यावर देखील जोरदार टीका केली. उद्धव ठाकरे यांच्या पक्षातील काही नेते आणि पदाधिकारी हे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाणार असल्याचा दावा केला जात आहे. यावर देखील शरद पवार यांनी भाष्य केले. काही माणसे अशी आहेत की जे पक्ष आणि बाळासाहेब ठाकरे यांची विचारधारा अजिबात सोडणार नाहीत. ठाकरेंची नेते हे त्यांचा पक्ष सोडतील असे मला वाटत नसल्याचे देखील शरद पवार यांनी म्हटले आहे.

## आजपासून एसटी बसचा प्रवास महागला; १५ टक्के भाडेवाढीचा निर्णय, रिक्षा-टॅक्सीबाबतही निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४मुंबई**

सर्वसामान्य प्रवाशांसाठी हक्काचे साधन अशी ओळख असणाऱ्या राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटी बसेसच्या तिकीट दरात १४.९७ टक्के वाढ करण्याचा निर्णय राज्य परिवहन प्राधिकरणाने घेतला आहे. ही दरवाढ आजपासूनच लागू होणार असल्याचीही माहिती प्राधिकरणाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे आता लालपरीचा प्रवास महागणार आहे. एसटी बसेससोबतच रिक्षा




आणि टॅक्सीच्या भाडेवाढीलाही मान्यता देण्यात आली असून या दोन्ही वाहनांच्या दरात ३ रुपयांची वाढ होणार आहे. रिक्षा आणि टॅक्सीची भाडेवाढ १ फेब्रुवारीपासून लागू होणार आहे.

राज्य परिवहन प्राधिकरणाची बैठक काल मंत्रालयात पार पडली. त्या बैठकीत एसटीसह रिक्षा आणि टॅक्सीच्या भाडेवाढीचा निर्णय घेण्यात आला. एसटीची भाडेवाढ गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. डिझेल आणि पेट्रोलचे दर वाढत असल्याने भाडेवाढ दरवर्षी होणे अपेक्षित असते. मात्र मागील ३ ते ४ वर्षांपासून एसटीची भाडेवाढ झाली नव्हती. त्यामुळे आता एकत्रित १४.९७ टक्के इतकी भाडेवाढ करण्यात आली असून ती आजपासून लागू होईल. तसंच रिक्षा आणि टॅक्सीच्या दरातही ३ रुपयांची वाढ करण्यात आली असून तो निर्णय १ फेब्रुवारीपासून लागू होणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.दरम्यान, भाडेवाढीमुळे रिक्षाचे किमान भाडे २३ रुपयांहून २६ रुपये इतके होणार असून टॅक्सीचे किमान भाडे २८ रुपयांहून ३१ रुपये इतके होणार आहे.

## लोकशाही वाचवण्यासाठी काँग्रेसचा एल्गार

### उद्या शनिवारी राष्ट्रीय मतदार दिनी राज्यभर आंदोलन : नाना पटोले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४मुंबई**

भारतीय जनता पक्ष व निवडणूक आयोगाने विधान सभेच्या निवडणुकीत मतांवर दरोडा टाकून लोकशाहीचा गळा घोटला आहे. भाजपा व निवडणुक आयोगाची ही अभद्र युती लोकशाहीला कलंक लावणारी आहे. लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी तसेच मतदारांच्या हक्कासाठी काँग्रेस पक्ष शनिवारी २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिनी राज्यभर जिल्हा व तालुका स्तरावर तीव्र आंदोलन करणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे.



पत्रकारांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत भाजपाने निवडणुक आयोगाच्या मदतीने घोटळा केला आहे. लोकसभा निवडणुकीनंतर सहा महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत ५० लाख मतदार कसे वाढले? मतदानाच्या दिवशी संध्याकाळी ५ नंतर रात्रीच्या अंधारात ७६ लाख मतदान कसे वाढले? याचे पुरावे निवडणूक आयोग देत नाही. राज्यात आलेले सरकार आपल्या मताचे नाही अशी जनभावना निर्माण झाली असून मतदान मतपत्रिकेवरच घ्यावे अशी मागणी जनतेतूनच येत आहे. लोकशाही अबाधित ठेवण्यासाठी निवडणूक आयोगाच्या भ्रष्ट कारभार थांबला पाहिजे, निवडणूका या निष्पक्ष, पारदर्शक व भयमुक्त वातावरणात पाडल्या पाहिजेत यासाठी काँग्रेस राष्ट्रीय मतदार दिनी दिवशी रस्त्यावर उतरून आंदोलन करणार आहे.

## ‘छावा’ सिनेमात छत्रपती संभाजी महाराज नृत्य करताना दाखवले

### मराठा क्रांती मोर्चा आक्रमक; युवराज संभाजीराजेंचीही नाराजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४कोल्हापूर**

अभिनेता विक्की कौशल आणि अभिनेत्री रश्मिका मंदाना यांची प्रमुख भूमिका असलेला ’छावा’ हा छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. मात्र या चित्रपटांमध्ये छत्रपती संभाजी महाराज आणि महाराणी येसूबाई यांना एकत्र नृत्य करताना दाखवले आहे. या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शन झाला आहे. आता या ट्रेलरवरून वादंग उठण्याची शक्यता वर्तवली जात आहे. छावा संघटना तसेच मराठा क्रांती मोर्चाने या चित्रपटाला विरोध दर्शवला आहे. तर माजी खासदार युवराज संभाजीराजे छत्रपती यांनी देखील यावर नाराजी व्यक्त करत आपली भूमिका मांडली आहे.

या संदर्भात माजी खासदार संभाजीराजे छत्रपती म्हणाले की, छावा या नावाने छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर चित्रपट येत आहे, ही आनंदाची बातमी आहे. हा चित्रपट तयार करणे हेच खूप मोठे धाडस आहे. छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास यातून जगासमोर येईल. मात्र चित्रपटाचे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर हे मला येऊन भेटले




होते. त्यांनी ट्रेलरची क्लिप मला दाखवली आहे. पण मी पूर्ण चित्रपट दाखवण्याची मागणी केली होती. माझ्यासोबत काही इतिहासकार यांना देखील पूर्ण चित्रपट दाखवण्याची मागणी माझी होती. त्यानंतर या चित्रपटात काही चूक असेल तर ते दुरुस्त करता येईल, असे माझे मत होते. मात्र इतिहासकारांना भेटण्यास त्यांनी स्वारस्य दाखवले नसल्याचे संभाजीराजे यांनी म्हटले आहे.

**आम्ही आणि इतिहासकार बसून यावर चर्चा करून मार्ग काढू – संभाजीराजे**

या संदर्भात संभाजीराजे छत्रपती म्हणाले की, दिग्दर्शक उतेकर यांनी शंभर ते दोनशे कोटी रुपये खर्च करून संभाजी महाराजांवरील हिंदी चित्रपट तयार केला आहे. या माध्यमातून महाराजांचा इतिहास आज जगभरात जाणार आहे. मात्र, ट्रेलर मध्ये महाराजांना नृत्य करताना दाखवल्यामुळे लोकांना ते कितपत पटेल याबाबत माझ्या मनात शंका असल्याचे ते म्हणाले. त्यामुळे आम्ही आणि राज्यातील इतिहासकार बसून यावर चर्चा करून मार्ग काढू, असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला आहे.

## संपादकीय ......

# सैफ की अनसेफ?

*गेले आठ दिवस झाले, अभिनेता सैफ अली खान यांच्या घरी रात्रीच्या वेळी झालेल्या हल्ल्याविषयी सर्वत्र भरभरून माहिती दिली जात आहे. न्यूज चॅनेल पाहणार्या आमच्यासारख्या सामान्य लोकांना ते आणि त्यांची मुले तैमुर इत्यादी आणि इतर कोणत्या बेडरूममध्ये झोपायचे? घरात येण्यासाठी दरवाजे कुठे आहेत? सीसीटीव्ही कुठे आहेत? चोर कसा आत शिरला, याविषयीची माहिती प्राप्त झाली आहे.*

*सदरील बातम्या पाहिल्यानंतर आमच्या लक्षात आले की, सैफ यांचे पहिले कुटुंब तिथेच जवळपास कुठेतरी राहत असावे अन्यथा भररात्री पहिल्या लग्नाचे ज्येष्ठ चिरंजीव आपल्या वडिलांच्या मदतीला धावून आले, हे शक्य झाले नसते. या ठिकाणी आम्हास हे समजत नाही की, या सगळ्या गोष्टींशी आमचा नेमका संबंध काय आहे? अरे बाबांनो, आम्ही आमच्या दुनियादारीमध्ये बर्यापैकी त्रासून गेलेले असतो. सकाळी उठल्याबरोबर मुलांना तयार करून शाळेत सोडायचे असते, डबा करून द्यायचा असतो, महिलांना घरातील स्वयंपाक करायचा असतो. पुरुषांना आणि बरेच ठिकाणी महिलांना दोघांनाही कामावर जायचे असते आणि संध्याकाळी आल्यानंतर पुन्हा मुलांना परत घेऊन येणे आणि इतर व्याप असतात. या व्यापात सैफ यांच्या घरी कधी हल्ला झाला? कसा झाला? यामध्ये आम्हाला काय इंटरेस्ट असेल? मीडियाला सतत काही ना काहीतरी ब्रेकिंग न्यूज लागत असते. ब्रेकिंग न्यूज मग ती सैफ अली खान यांच्याबद्दल असो की, परळी निवासी श्रीमान वाल्मीक, मुंडे यांच्या बाबत असो. नवनवीन बातम्यांसाठी अधाशी असलेला मीडिया हा एक फार मोठे माध्यम आहे. कितीही बातम्या आल्या, तरी त्या कमीच पडतात, असे दिसून आले आहे.*

*या बातम्यांच्या भडिमारामध्ये सर्वसामान्य लोक कधीच कंटाळून जात नाहीत. ते अगदी कूतूहलपणे पाहत असतात. त्याच त्या बातम्या पाहून आता आमचेही जनरल नॉलेज पुरेपूर झालेले आहे. एखादा वकील ज्या निष्णातपणे कायद्याच्या कलमांची माहिती देतो तेवढ्याच कौशल्याने आम्ही तत्काळ या गुन्हेगाराला कोणती कलमे लागणार आहेत, हे सांगू शकतो. आपल्या सामान्यज्ञानामध्ये मीडियाने जी भर घातली आहे, त्याविषयी आपण कृतज्ञ असले पाहिजे.*

*सैफ यांच्या घरात घुसलेला चोर हा मुळात बांगला देशी आहे, हा एक नवीन ट्विस्ट त्या कथेमध्ये आला आहे. सदरील चोर महोदय हे बांगला देशातील पैलवान असून आर्थिक टंचाईमुळे भारतात येऊन चोर्यामार्या करायला लागलेले आहेत. या चोर महोदयांच्या बांगला देशी असण्यामुळे भारतात मुक्त संचार करणारे सर्व बांगला देशी धास्तावले आहेत. याचे कारण असे की, सर्वत्र बांगला देशी लोकांचा शोध घेतला जात आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून राहणारे बांगला देशी सैफ यांच्या घरी चोरी करण्यास गेलेल्या चोराच्या नावे निश्चितच बोटे मोडत असतील. बांगला देशात सध्या अंतर्गत यादवी माजलेली आहे. त्यामुळे तेथील पंतप्रधान कोण आहेत, याविषयीसुद्धा कुणाला काही माहिती नाही. अशावेळी बांगला देशचे नाव रोशन करणार्या सैफ यांच्या घरात आलेल्या चोराला त्या देशाने 'बांगलाभूषण' पुरस्कार द्यायला हरकत नाही. ज्याला जे करायचे ते त्याने करावे; परंतु कृपया आम्हा सामान्य नागरिकांची या मीडियाच्या जंजाळातून सुटका करावी, ही संबंधितांना विनंती!*

# विविध पिकांसाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांना मोठा लाभ होणार

## जिल्ह्यात स्मार्ट प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्यांना मोठा लाभ

बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प अंतर्गत राज्यातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व कृषी नवउद्योजकांना केंद्रस्थानी ठेवून पिकाच्या स्पर्धात्मक व सर्वसमावेशक मूल्यसाखळी विकासासाठी मदत करणे हे स्मार्ट प्रकल्पाचा उद्देश आहे. तसेच कृषिमालावर आधारित प्राथमिक व दुय्यम प्रक्रिया करून मूल्यवृद्धी घडवून आणणे व कृषिमालाच्या पणन विषयकपायाभूत सुविधा निर्माण करणे, हे या प्रकल्पाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. राज्यातील शेतकरी आणि ग्रामीण भागातील विकासासाठी हा महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे.




प्रकल्पाचा मुख्य उद्देश:

लहान आणि सीमांत शेतकऱ्यांची उन्नती: या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे लहान आणि सीमांत शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे आणि त्यांचे जीवनमान सुधारणे.

कृषि मूल्य साखळीचे सुदृढीकरण: शेतमालाच्या उत्पादनापासून ते ग्राहकपर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेत सुधारणा करून शेतकऱ्यांना अधिक नफा मिळवून देणे.

ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती: कृषी क्षेत्रात आणि त्याशी संबंधित उद्योगधंद्यांमध्ये रोजगार निर्मिती करून बेरोजगारी कमी करणे.

तंत्रज्ञानाचा वापर: आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीची उत्पादकता वाढवणे आणि खर्च कमी करणे.

स्मार्ट प्रकल्पांतर्गत जिल्ह्याला ३७ शेतकरी उत्पादक कंपन्यांचे लक्षांक असून आज अखेर २४ शेतकरी उत्पादक कंपन्यांना अंतिम मंजूरी प्राप्त आहे. त्यापैकी २० शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रकल्प कृषी विभागामार्फत राबविण्यात येत आहे. यातील २ प्रकल्प हे महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन (तडढक्र) मार्फत तसेच १ प्रकल्प अनुक्रमे महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ (चउऊ) व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (चडठडच्) यांचे मार्फत राबविण्यात येत आहे. हा प्रकल्प लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून, त्यांना आधुनिक कृषी पद्धती, बाजारपेठेत प्रवेश आणि आर्थिक सक्षमता यासाठी सहकार्य करतो.

जिल्ह्यात एकूण २४ मंजूर उप-प्रकल्पाला ६ हजार ४३५ लाख स्मार्ट प्रकल्पातून अनुदान मंजूर असून त्यापैकी आज अखेर १७९५.१० लक्ष रुपये एवढे अनुदान वितरीत करण्यात आले आहे. तसेच वितरीत अनुदानमधील निधीपैकी ९४८.५४ लाख रुपये खर्च

**अपर्णा यावलकर**
माहिती अधिकारी,अमरावती

करण्यात आले आहेत.

एकूण मंजूर २४ उप प्रकल्पापैकी १२ प्रकल्प हे संत्रा पिकामध्ये काम करणार आहेत. तूर चना सोयबीन मध्ये ६ प्रकल्प तसेच २ प्रकल्प हे कापूस पिकामध्ये काम करणारे आहेत. २ प्रकल्प अनुक्रमे गोडावून बांधकाम व गहू पिकामध्ये काम करणार आहेत.

संत्रा, तूर, कापूस, गहू यासह विविध पिकांसाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांना मोठा लाभ होणार

जिल्ह्यात स्मार्ट प्रकल्पांतर्गत २४ शेतकरी उत्पादक कंपन्यांना अंतिम मंजुरी मिळाली असून यातून संत्रा, तूर, कापूस, गहू यासह विविध पिकांच्या उत्पादनात वाढ होण्यास मदत होणार आहे. यामुळे शेतकरी उत्पादक कंपन्यांना मोठा आर्थिक लाभ होणार असून त्यांची उत्पन्न वाढीस लागणार आहे. स्मार्ट प्रकल्पामुळे आधुनिक पद्धतींचा वापर आणि बाजारपेठेचा विकास यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते. तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीची उत्पादकता वाढवून खर्चात कपात करता येते. ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकासास हातभार लागतो.



शेतकरी आत्मनिर्भर बनतात आणि शेती व्यवसायाकडे आकर्षित होतात.

# सोलर पंप लावून देण्याच्या नावाखाली फसवणूक होऊ शकते, जाणून घ्या सविस्तर







**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**

एकीकडे शासनाच्या मागेल त्याला सोलर पंप शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला आहे. अनेकांचे अर्ज मंजूर होत आहेत. तर काही शेतकऱ्यांचे जॉईंट सर्व्हे होत असून काही शेतकऱ्यांना सोलर पॅनल बसवून दिले जात आहे. मात्र या योजनेत अनेक एजंटचा सुळसुळाट झाला आहे. यवतमाळ जिल्ह्यात फसवणुकीचा प्रकार समोर आला आहे.

शेतकऱ्यांना दिवसा सिंचन शक्य व्हावे, यासाठी केंद्र शासनाच्या माध्यमातून सोलर पंप योजना राबवली जात आहे. या योजनेअंतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा तालुक्यात फसवणुकीची घटना घडली आहे. तालुक्यातील तेलंगटाकडी येथील शुभम भीमराव पाटील या शेतकऱ्याच्या बाबत ही घटना घडली आहे. सोलर पंप लावून देण्याच्या नावाखाली या शेतकऱ्याला गंडा घातला आहे.

दरम्यान या शेतकऱ्याच्या शेतात सोलर पंप अपडेट करुन त्यावर मेडा कंपनीकडून सोलरसाठी सरकारी अनुदान देतो. त्यावर ०५ ते ७.०५ एच.पी.ची मोटार मिळवून देतो, असे म्हणून स्वतःच्या आर्थिक फायद्याकरिता चार लाख १५ हजार १०१ रुपयांनी फसवणूक केली. याप्रकरणी पवन प्रमोद गौरकार रा. स्वप्नीलनगर वडगाव यवतमाळ याच्याविरुद्ध कलम ४०६, ४२० भान्यासं अंतर्गत पांढरकवडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.




### इथे करा तक्रार

मागेल त्याला सोलर पंप योजनेत लाखो शेतकऱ्यांनी सहभाग घेतला आहे. त्यामुळे या योजनेच्या नावाखाली एजंटचा सुळसुळाट सुरु आहे. अनेक शेतकरी यात फसले जाऊ शकतात. म्हणून शेतकऱ्यांनी सतर्क राहून कोणत्याही व्यक्तीला माहिती दयावी. किंवा काही महती हवी असल्यास थेट मागेल त्याला सोलर पंप योजनेच्या अधिकृत वेबसाईटवर पाहायला मिळेल.




## पेप्टिक अल्सरची समस्या, जाणून घ्या कारणे आणि लक्षणे

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक** – पोटात म्युकसचे चिकट थर असतात. अन्नाच्या पचनासाठी आवश्यक असलेले हायड्रोक्लोरीक आम्ल आणि पेप्सिन यांचा पोटाच्या त्वचेवर दुष्परिणाम होऊ न देण्याचे काम हे थर करतात. म्युकसचे थर आणि हायड्रोक्लोरीक आम्ल यांच्यातील सुसंवाद बिघडला की हायड्रोक्लोरिक आम्लाचा थेट पोटाच्या त्वचेवर परिणाम होऊ लागतो. सहसा अन्ननलिका, जठर आणि लहान आतडे यांना अल्सरचा त्रास होतो.

**अल्सरचे प्रकार–** इसोफॅजियल अल्सर : अन्ननलिकेला होणार्या अल्सरचे हे नाव आहे. या अल्सरचे प्रमाण कमी आहे.

**गॅस्ट्रिक अल्सर** : जठराला होणारा अल्सर म्हणजे गॅस्ट्रिक अल्सर होय.

**ड्युओडिनम अल्सर** : लहान आतड्याच्या वरच्या भागाला ड्युओडिनम म्हणतात. याला होणारा अल्सर या प्रकारात मोडतो. या अल्सरचे प्रमाण अधिक आहे.

**कारणे आणि लक्षणे** –एच पायरोली या बॅक्टेरियामुळे पेप्टिक अल्सर मोठ्या प्रमाणात होतो. मल आणि घाणेरडे पाणी यांच्याद्वारे याचा फैलाव होतो. पावसाळ्याच्या दिवसांत पाणी खराब होण्याचे आणि आजूबाजूला घाण पसरण्याचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे पावसाळ्यात या प्रकारचा अल्सर मोठ्या प्रमाणात झाल्याचे आढळते. या दिवसांत शरीराची हालचाल आणि त्याचबरोबर रोगप्रतिकारशक्तीही कमी असते. चहा, कॉफी, तळलेले, मसालेदार पदार्थ खाणे यांमुळे या अल्सरच्या तीव्रतेत वाढ होते. स्वच्छता राखणे हा यावरचा प्रतिबंधक उपाय आहे.

पोटदुखी हे याचे प्रमुख लक्षण आहे. रिकाम्या पोटी पोट अधिक दुखते. पोटातील आम्ल अल्सरग्रस्त पेशीवर परिणाम करू लागल्यामुळे पोट दुखते. रात्री पोटातील जळजळ वाढते. काही वेळा रक्ताची उलटी होते. मळमळ होणे, मलाचा रंग गडद होणे, भुकेच्या प्रक्रियेत बदल होणे अशी याची लक्षणे



असतात. हेलिकोबॅक्टर पायरोली या बॅक्टेरियाच्या फैलावामुळे हा अल्सर होतो. ताणतणाव, मधुमेह, आनुवंशिकता, दारू, कॉफी, तंबाखू अधिक प्रमाणात सेवन, हाडे ठिसूळ झाल्यामुळे घेतल्या जाणार्या औषधांचे दुष्परिणाम, दीर्घ काळ वेदनाशामके घेणे ॲस्प्रिन आणि जळजळरोधक औषधे घेणे यांमुळे अल्सर होतो. पेप्टिक अल्सरमुळे ॲनिमिया आणि अधिक रक्तस्राव होतो. शिवाय दीर्घ काळ अल्सरचा त्रास झाला तर पोटाच्या किंवा आतड्याच्या कर्करोगाची शक्यताही वाढते. अंतर्गत रक्तस्रावामुळे शरीरात रक्ताची कमतरता निर्माण होते. जठराच्या किंवा छोट्या आतड्याच्या भित्तिकेला छिद्रही पडू शकते. त्यामुळे आतड्यांना गंभीर संसर्ग होण्याची शक्यता असते. पेप्टिक अल्सरमध्ये जठराच्या ऊतींचेही नुकसान होऊ शकते. त्यामुळे अन्नाच्या पचनमार्गात अडथळा निर्माण होतो. त्यामुळे पोट लवकर भरणे, उलटी होणे आणि वजन कमी होणे यांसारखे दुष्परिणाम दिसू लागतात.

# प्रजासत्ताक दिनानिमीत्त देशभक्तीपर गित व सत्कार सोहळा

## आशिष अतकरे मित्र मंडळाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती–** गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने भारतीय जनता पाट शहर जिल्हा व माजी नगरसेवक आशिष अतकरे मित्र परिवारच्या वतीने खोलापुरी गेट परिसरातील हनुमान नगर येथे प्रजासत्ताक दिनानिमित्ताने देशभक्तीपर गितांचा कार्यक्रम व सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात येत असते. यावष सुध्दा हा कार्यक्रम सकाळी ९.३० वाजता आयोजीत करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाचे उद्धाटक भाजपा शहरजिल्हा अध्यक्ष आ.प्रविण पोटे यांच्या हस्ते होईल. अध्यक्षस्थानी भाजपाचे विदर्भ संघटन मंत्री उपेंद्र कोठेकर राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा नेते किरण पातुरकर, जयंत डेहणकर, शिवराय कुळकण, रविंद्र खांडेकर, नितिन धांडे, दिनेश सुर्यवंशी, ड. प्रशांत देशपांडे राहतील. यावेळी चेतन पवार, विवेक कलोती, सतिश करेसिया, गंगाताई खारकर, मनपा उपायुक्त नरेंद्र वानखडे, कंत्राटदार असोसिएशनचे अध्यक्ष सतिश परदेसी, खोलापुरी गेटचे पोलीस निरीक्षक गौतम पातारे, ब्लु टायगर ग्रुपचे अध्यक्ष परमेश्वर आठवले, कौशिक अग्रवाल, मनिष चौबे, विजय सावरकर, शेखर मकवाने, हरिष साऊरकर, निलेश देशमुख, सारंग राऊत आदी उपस्थित राहतील.या कार्यक्रमात प्रा.डॉ. दिपक चौधरी व त्यांचा संच हा देशभक्तीपर सुमधुर गिते सादर करतील. या कार्यक्रमानिमित्ताने २४ जानेवारीला लखडोबा हनुमान मंदिर, हनुमान नगर येथे भव्य रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात



आले आहे. या स्पर्धेत १५०१, १००१, व ७०१ रुपयांचे अनुक्रमे प्रथम, व्दितीय व तृतीय पारिषोतीक अ गटात तर ब गटात अनुक्रमे १००१, ७०१ व ५०१ रुपयांचे पारितोषीके देण्यात येईल. तसेच दोन्ही गटात ५ प्रोत्साहनात्म पुरस्कार म्हणून सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र व आकर्षक साडी देण्यात येणार आहे. वेगवेगळ्या विषयांवर ही रांगोळी स्पर्धा होणार असून या स्पर्धेतील विजेत्यांना २६ जानेवारीच्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित केल्या जाणार आहे.

# तांदूळ आणि डाळीला कीटकांपासून रोखण्यासाठी हे सोपे उपाय वापरा, वाचा सविस्तर

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**

तांदूळ आणि डाळ हे आपल्या दैनंदिन आहाराचा एक महत्त्वाचा भाग आहेत. हे दुपारच्या जेवणासाठी किंवा रात्रीच्या जेवणासाठी शिजवायला सोपे आहेत, परंतु ते योग्यरित्या साठवणे आव्हानात्मक असू शकते. जर ते योग्यरित्या साठवले गेले नाहीत तर त्यांना कीटकांचा प्रादुर्भाव होण्याचा धोका वाढतो, ज्यामुळे त्यांना फेकून द्यावे लागू शकते. पण थोडी काळजी घेतली तर या समस्येपासून सुटकारा मिळू शकतो.

तांदूळ आणि डाळींना कीटकांपासून वाचवणे कठीण नाही, फक्त थोडी सावधगिरी आणि योग्य पद्धत अवलंबण्याची आवश्यकता आहे. कडुलिंबाची पाने, काळी मिरी आणि तमालपत्र यांसारखे उपाय केवळ सोपे आहेतच, शिवाय धान्य सुरक्षित ठेवण्यासाठी देखील प्रभावी उपाय म्हून काम करतात. भात आणि डाळींचे कीटकांपासून संरक्षण करण्यासाठी काही प्रभावी उपायांबद्दल सविस्तर जाणून घेऊया...




**वाळलेल्या कडुलिंबाची पाने**

कीटकांपासून वाचवण्यासाठी सुक्या कडुलिंबाच्या पानांचा वापर खूप फायदेशीर आहे. जेव्हा तुम्ही ते साठवता तेव्हा वाळलेल्या कडुलिंबाची पाने डब्यात ठेवा. कडुलिंबाच्या पानांमधून भात आणि डाळींना येणारा तीव्र वास कीटकांना दूर ठेवतो. पाने पूर्णपणे कोरडी आणि स्वच्छ असल्याची खात्री करा.

**काळी मिरीचा वापर**

तांदूळ आणि डाळ साठवताना काळी मिरी देखील वापरली जाऊ शकते. एका छोट्या कापडात काळी मिरी बांधा आणि ती तांदूळ किंवा डाळीच्या भांड्यात ठेवा. यामुळे कीटक जवळ येण्यापासून रोखले जातील आणि तुमचे धान्य सुरक्षित राहील.

**तमालपत्राचे फायदे**

तमालपत्र केवळ अन्नाची चव वाढवण्यासाठीच उपयुक्त नाही तर ते तांदूळ आणि डाळींना कीटकांपासून वाचवण्यास देखील मदत करते. डब्यात तमालपत्र ठेवल्याने कीटक हळूहळू पळून जाऊ लागतात. हा उपाय सोपा आणि प्रभावी आहे.

**इतर उपाय**

हवाबंद डब्यांचा वापर करा : तांदूळ आणि डाळ नेहमी हवाबंद डब्यात ठेवा.

**उन्हात वाळवणे** : साठवण्यापूर्वी तांदूळ आणि डाळ उन्हात चांगले वाळवा.

**कमी प्रमाणात साठवा** : तांदूळ आणि डाळ कमी प्रमाणात साठवण्याचा प्रयत्न करा.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २४ जानेवारी २०२५ — शहर/ग्रामिण


# ड्रोनचे प्रशिक्षण विविध क्षेत्रात उपयुक्त ठरणार - जिल्हाधिकारी सौरभ कटियार

## भातुकली येथे किसान ड्रोनचे प्रात्यक्षिक



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ अमरावती–** जिल्हा कौशल्य व उद्योजकता विभागातर्फे ड्रोन हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. युवकांना या माध्यमातून रोजगाराचे साधन उपलब्ध होणार आहे. सध्या शासनही विविध कामांसाठी ड्रोनचा उपयोग करीत असल्याले ड्रोन हाताळण्याचे प्रशिक्षण उपयुक्त ठरणार आहे, असे मत जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी व्यक्त केले.

भातकुली येथे स्वराज फाऊंडेशनच्या वतीने ड्रोन प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी कौशल्य विकासच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर, तहसिलदार अजितकुमार येळे, तालुका कृषी अधिकारी श्रीमती भोसले, नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी श्रीमती बोरेकर आदी उपस्थित होते.श्री. कटियार यांनी, किमान कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय सर्वसाधारण योजनेतून प्रशिक्षणाच्या योजनेसाठी एक कोटी रूपयांचा निधी देण्यात आला आहे. यातून जिल्ह्याभरात १० प्रशिक्षण संस्था कौशल्य प्रशिक्षण राबवित आहे. यामध्ये २७ प्रशिक्षण तुकड्यातून ८१० प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत आहेत, महिला ड्रोन प्रशिक्षण घेणार असल्याने त्यांचे सक्षमीकरणही होणार आहे. शेतीमध्ये ड्रोनच्या उपयोगाबाबत ग्रामीण भागात शंका आहे, त्यामुळे त्यांच्या शंकांचे निरासन हे ड्रोनची उपयोगिता सिद्ध करून दाखवावे लागणार आहे. गेल्या काळात स्वामित्व योजनेत गावातील मालमत्तांचे सर्व्हेक्षण करण्यासाठी ड्रोनचा उपयोग करण्यात आला. पोलिस, रेल्वे, वीज पुरवठा आदी क्षेत्रात ड्रोनचा सक्षमपणे उपयोग करण्यात येत आहे. सर्व घटकांसाठी मोफत असलेले प्रशिक्षण घेऊन युवकांनी कृषि विभागातर्फे असलेल्या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी योवळी केले.

भातकुली तालुक्यामध्ये स्वराज एज्युकेशन सेंटर संस्थेतर्फै ग्रीकल्चर सेक्टरमध्ये उपयुक्त किसान ड्रोन ऑपरेटर अभ्यासक्रमासाठी ९० प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत आहे. यात ५२ महिलांचा सहभाग आहे. या प्रशिक्षणात जिल्ह्यातील प्रशिक्षणार्थींना सदर योजनेंतर्गत मोफत प्रशिक्षण देण्यात येत आहे. सुरवातीला किसान ड्रोनचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी ड्रोनच्या जनजागृतीबाबत पथपाट्य सादर केले.सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी प्रास्ताविक केले. प्रशिक्षणार्थी जयश्री खडसे यांनी मनोगत व्यक्त केले. संप्रदा डाखरे यांनी सूत्रसंचालन केले. धनंजय डाखरे यांनी आभार मानले.

# अंजनगाव सुर्जी तालुक्यात सिसीआय कापूस खरेदी रखडली

## कापूस घरातच पडून, शेतकरी चिंताग्रस्त, व्यापाऱ्यांचे चांगभले



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती–** अंजनगाव सुर्जी तालुक्यात सिसीआयमार्फत कापूस खरेदीला सुरू झाली होती. परंतु अचानक २० जानेवारीपासून भारतीय कापूस निगम अर्थात सिसीआयमार्फत होणारी कापूस खरेदी बंद झाल्याने अनेक शेतकऱ्यांच्या घरात कापूस पडून आहे. शासनाच्या तुलघकी कारभारामुळे मात्र व्यापाऱ्यांचे चांगभले होत आहे तर शेतकऱ्यांमधून संतप्त भावना व्यक्त होत आहे.

तालुक्यात काळी कसदार व गाळा जमिन असल्यामुळे बागायती क्षेत्रांवर मोठ्या प्रमाणात कपाशीचे पिक घेतल्या जाते. यामुळे तालुक्यात कापसाचे उत्पादनही दर्जेदार होत आहे. नगदी पिक म्हणून शेतकरी कपाशीला पसंती देतात. गेल्या काही वर्षात अंजनगावसुर्जी तालुक्याला कापूस व्यापाराचे हब म्हणून ओळख निर्माण झाली आहे. खरीप हंगामातील कापसाची मोठी उलाढाल सद्या बाजारपेठेत होत आहे. कापूस पणन महासंघ मोडीत निघाल्याने सीसीआयमार्फत कापसाची हमी दराने ७,५२५ रुपये किंटलप्रमाणे खरेदी सुरू केली होती. तालुक्यात उशीरा का होईना सीसीआय कापूस खरेदीचे बरेचशे कापूस खरेदी केंद्रही सुरू होवून कपाशी खरेदीला सुरूवात झाली होती. अशातच २० जानेवारीपासून कापूस खरेदी बंद झाल्याची माहिती आहे.जिल्ह्यातील इतर कापूस खरेदी केंद्रे सुरु असताना अंजनगांवसुर्जी तालुक्याची खरेदी बंद केल्याने ग्रेडरच्या या निर्णयामुळे ज्या शेतकऱ्यांकडे कापूस घरातच पडून आहे. कापसाचे विक्री केली नाही त्यांना खुल्या बाजारात कमी दराने कापूस विकावा लागणार असल्याने सिसिआय कापूस खरेदी पुर्वत सुरु करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

# कुंभमेळ्यासाठी अमरावतीहून विशेष रेल्वेगाडी उपलब्ध करून द्या

## नवनीत राणा यांची केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे पत्राद्वारे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती–** उत्तर प्रदेशात प्रयागराज येथे महाकुंभ मेळावा सुरू असून या कुंभमेळाव्यासाठी अमरावतीहून प्रयागराजसाठी विशेष रेल्वेगाडी सोडण्यात यावी, अशी मागणी माजी खासदास नवनीत राणा यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. प्रयागराज येथे १३ जानेवारीपासून महाकुंभमेळावा सुरू झाले आहे. हा मेळावा २६ फेब्रुवारीपर्यंत महाशिवरात्रीपर्यंत चालणार आहे. या महाकुंभ मेळाव्यासाठी देशविदेशातून नागरिक येत आहेत. अमरावती आणि लगतच्या जिल्ह्यातील लाखो नागरिक प्रयागराज येथे जाण्यास



इच्छूक आहेत. परंतु त्यांना प्रयागराजला जाण्यासाठी सोयीस्कर प्रवासाची सुविधा नाही.परिणामी नागरिक महाकुंभ मेळाव्यात सहभागी होण्यापासून वंचित राहत आहेत. प्रवाशांची मागणी लक्षात घेता, त्यांना कुंभमेळाव्यात सहभागी होता यावे, यासाठी अमरावती रेल्वे स्थानकाहून प्रयागराजपर्यंत दररोज कुंभमेळावा विशेष रेल्वेगाडी सुरू करण्यात यावी. असे नवनीत राणा यांनी या पत्रात म्हटले आहे.

# खतांचा अवैध साठा जप्तीप्रकरणी गुन्हा दाखल

## ८ जानेवारीला पकडला होता हिवरखेड येथून साठा





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती –** मोर्शी तालुक्यातील हिवरखेड येथील एका घरात अवैधपणे साठवणूक केलेला सांगली येथील मिलेनिया ॲग्रो लाइफ या कंपनीच्या सेंद्रिय खताच्या सहाशे बॅगचा साठा कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी दि. ८ जानेवारीला सिल केला होता. या खताच्या विक्रीचा, साठवणीचा कुठलाच परवाना संबंधिताजवळ नव्हता. याप्रकरणी मोर्शी पोलिसात तब्बल १५ दिवसानंतर पाच जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. मिलेनिया ॲग्रो लाइफ सांगली, निलेश जुहरमल पोरवाल, परेश पारसमन पोरवाल, आप्पासाहेब थोरात रा. सर्व सांगली व निलेश भेले रा. अंजनगाव सुर्जी, असे गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. मोर्शी पंचायत समितीचे कृषी अधिकारी राहुल चौधरी, गुणनियंत्रण विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय अमरावतीचे तंत्र अधिकारी रमेश जानकर, विभागीय गुण नियंत्रण निरीक्षक संजय पाटील व जिल्हा कृषी अधिकारी अजय तळेगावकर यांनी तालुक्यातील हिवरखेड येथे ८ जानेवारीला धाड टाकून एका घरातून सहाशे खताच्या बॅगा जप्त करून सील केल्या होत्या. त्याचे नमुनेसुद्धा प्रयोगशाळेला पाठविण्यात आलेले होते.यामध्ये बायो सुपर ऑरगॅनिक दाणेदार खतांच्या १०० व सेंद्रिय शेती मिलेनिय, मिलेनिया बायो एफ रॅपिडच्या ४० किलो वजनाच्या ५०० खतांच्या गोण्या आढळून आल्या होत्या. सदर ठिकाणचा साठवणुकीचा अथवा विक्री करण्याचा परवाना तेथील निलेश भेले याच्याकडे आढळून आला नाही तर निलेश भेले याने घरमालक मनोज पाचारे यांची ही जागा दोन हजार रूपये प्रतिमहा प्रमाणे भाडेदराने घेतली होती. निलेशभेले याच्याकडे खत साठवणूक व विक्री। परवाना नसल्याचे निदर्शनास आल्याने रसायनिक खत नियंत्रण आदेशाचे उल्लंघन झाले आहे. तसेच ते शेतकरी यांना कोणतेही बिल न देता खताची विक्री व साठवणूक करीत असल्याने तसेच कोणताही दस्तऐवज ठेवत नसल्याचे दिसून आले. त्याचबरोबर मिलेनिया ॲग्रो लाईफ या कंपनीकडे रिटेल विक्री करता परवाना नसल्याने त्यांच्या विरोधात मोर्शी पंचायत समितीचे कृषी अधिकारी राहुल चौधरी यांनी मोर्शी पोलीस स्टेशनमध्ये दि २२ जानेवारीला तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार अत्यावश्यक वस्तू अधिनियम व रासायनिक खते नियंत्रणनुसार विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहे.

# विश्व कृत्रिमदंत शास्त्र दिवस विविधउपक्रमाने साजरा




## दंत महाविद्यालय चे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ अमरावती–** विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी संचालित दंत महाविद्यालय व रुग्णालय अमरावती वतीनेविश्व कृत्रिमदंतशास्त्र उत्सवदिवस २२ जानेवारी दरवर्षी साजरा करण्यात येतो आठवडाभर चालणाऱ्या उत्सवाची सुरुवातराष्ट्रमाता जिजाऊ स्मारक कॅम्प अमरावती येथे जिजाऊ ना अभिवादन करून करण्यात आली.विविध प्रकारचे उपक्रमया निमित्ताने आयोजित करण्यात आले होते. वयोवृद्ध रुग्णांकरता मोफत चिकित्सा विभागाचे नविनिकरन उद्घाटनदंत महाविद्यालयाचे अधिष्ठाताडॉ.राजेश गोंधळेकर,भारतीय कृत्रिम दंतशास्त्र संघटनेचे अध्यक्षा डॉ.अपर्णा बारब्दे यांच्या हस्ते करण्यात आले विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध क्षेत्रातील नामांकित तज्ञ प्रा. डॉ कृष्णकुमार लाहोटी यांचे वयोवृद्ध पूर्ण मुख पुनर्वसन या विषयावर व्याख्यान मार्गदर्शन करण्यात आले. शैक्षणिक कामगिरी व रुग्णसेवा व्यतिरिक्त क्रीडा, कला, सांस्कृतिक क्षेत्रात विकसित महत्त्व देत, स्लोगन प्रति स्पर्धा, पूर्वध्यात्र पात्र वार्ता , इत्यादी कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, मोफत कृत्रिम कवळी शिबिर,घेऊन रुग्णांना सेवा देण्यात आली यानिमित्ताने समाजामध्ये दंत उपचार करीता जनजागृती पर अभियान अंतर्गतअमरावती शहरात ठीक ठिकाणी पथनाट्य सादर करण्यात आले सोबतच महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण, झाडे लावा झाडे जगवा कार्यक्रम घेण्यात आलाविश्व कृत्रिमदंत शास्त्र दिवस उत्सव साजरा करण्याकरीता इंडियन प्रॉस्थो डोन टिक सोसायटीच्या अध्यक्ष्या प्रा. डॉ अपर्णा बारब्दे,डॉ.ब्रजेश दम्मानी,डॉ भाग्यश्री चिमोटे, डॉ भूषण वानखडे, डॉ राहुल अडवाणी,डॉ.श्रद्धा अंबाड कर, डॉ कोमल वरघने, डॉ सोनाली शंभरकर,डॉ.समीक्षा अजमिरे,सौ.वैशाली साबळे,जितेंद्र गायकवाड,समित राठोड,सय्यद हाफिजुद्दी,राजेश ताजने,मराठा सेवा संघाचे जिल्हासचिव संजय ठाकरे यांचे मोलाचे योगदान लाभले या अभियान करीता पदवीत्तर डॉ नीलिमा,डॉ सिध्दी, डॉ लक्ष, डॉ रेवती,डॉ प्रसाद,डॉ शीतल यांनी अथक परिश्रम घेतले

# रेवसा येथे पूर्व गर्भलिंग परीक्षण व तंत्रज्ञान च्या कायद्याचे मार्गदर्शन मेळावा



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२४अमरावती –** ६महानगर पालिका व विधीप्राधिकरण तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय च्या वतीने अमरावती पासून जवळच असलेला रेवसा ह्या ग्रामीण क्षेत्रात संत ब्रम्हचारी महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सव मध्ये विविध महाविद्यालय मधील विद्यार्थ्यांने मलकांब चे प्रत्याक्षीक दिले , गर्भलिंग परीक्षण करू नये त्या बाबत सामाजिक महाविद्यालय मधील महिला विद्यार्थिनीने पथ नाट्य केले मुल – मुली एक समान कसे असतात त्या चे प्रात्याक्षिक दाखवण्यात आले ह्या कार्यक्रमाचे अध्यक्ष संत अचुत महाराज यांचे शिष्य संत सचिन देव महाराज यांनी भूषवले कार्यक्रमाचे मार्गदर्शन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ दिलीप सोंदळे यांनी कुठेही गर्भलिंग परीक्षण होत असेल तर तत्काळ जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय येथील जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयात कळवावे किंवा दिलेल्या हेल्प लाईन नंबर व माहिती दयावी, तसेच डॉ विशाल काळे आरोग्य अधिकारी मनपा यांनी सुद्धा मार्गदर्शन केले की कुटुंबातील कोणी व्यक्ती गर्भवती स्त्री ला मुलगा आहे की मुलगी तपासणी साठी तगादा लावत असेल किंवा त्रास देत असेल त्यांची तक्रार महानगर पालिकेच्या तक्रार निवारण केंद्राला देण्यात यावी ,त्यांनतर डॉ रुपेश खडसे साथ रोग नियंत्रण अधिकारी मनपा यांनी सुद्धा महिलांना व मेळाव्यातील जनतेला संबोधित केले की बेटी बचाव बेटी पढाव मुलगी शिकली तर दोन कुटुंब परिवाराचे उध्दार होतो असे सांगितले कार्यक्रमाचे आयोजक संस्थेचे अध्यक्ष जयंतराव केंद्रेरे यांनी केले असून ह्या विशेष उपस्थित विधी प्राधिकरण चे न्यायदिश, जिल्हा विधी सल्लागार ॲड. भाकरे ,देवेंद्र बायसकर,व विविध महाविद्यालय येथील प्राचार्य उपस्थित होते शेकडो महिलांनी ह्या कार्यक्रमाचा लाभ घेतला.

# शहरात वास्तव्यास असणाऱ्या बांगलादेशी नागरिकांची पोलिसांकडून तपासणी सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती**

२१शहरात वास्तव्यास असलेल्या बंगाली नागरिकांच्या आधाराने बांगलादेशी नागरिक राहतात, असा आरोप काही राजकीय पदाधिकाऱ्यांनी केला होता. त्या आधारावर पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी शहरात बांगलादेशी नागरिकांची धरपकड सुरु केली आहे. पुण्यासह मुंबईत दोन बांगलादेशी नागरिकांना संबंधित पोलिसांनी पकडून अटक केली होती. तसेच शहरातील काही राजकीय पदाधिकाऱ्यांनी याआधी शहरात बांगलादेशी नागरिक राहत असल्याचा आरोप केला होता. शहरातील काही कपडा व्यापाऱ्यांचे शहरात कपडे शिवण्याचे बरेच कारखाने आहेत आणि या सर्व कारखान्यात बंगाली नागरिक काम करतात.तसेच सराफा बाजारात सुध्दा मोठ्या प्रमाणात बंगाली कारगिर आहेत, परंतु या बंगाली नागरिकाच्या आधाराने बांगलादेशी नागरिक शहरात राहत असावेत, अशी शंका असल्याने शहर पोलिसांनी शहरात राहणाऱ्या ३०० बंगाली नागरिकांची चौकशी सुरू केली आहे.गुरुवारी सकाळी गुन्हे शाखेच्या युनिट दोन व एटीबी च्या पथकाने रहाटगाव मार्गावरील अंबा बिजनेस पार्क येथे काम करणाऱ्या सर्व बंगाली नागरिकांची तपासणी केली.त्यावेळी पोलिसांसह आधारकार्ड तपासणी केंद्रसुध्दा तिथे लावण्यात आले होते. दरम्यान पोलिसांनी अंबा बिजनेस पार्कमध्ये काम करणाऱ्या ९४ बंगाली नागरिकांचे आधारकार्ड, वीज बिलची तपासणी केली. तसेच प्रत्येकांचे फिंगर प्रिंट व डोळ्यांची तपासणी करून खात्री करून घेतली. आज झालेल्या तपासणीत एकही बांगलादेशी नागरिक आढळला नाही. परंतु शहरात राहणाऱ्या ३०० बंगाली नागरिकांचीपोलीस सतत तपासणी करून त्यांची पुर्ण माहिती अद्ययावत करणार आहेत.

### कठोर कारवाई करावी- सुनील खराटे



बनावट कागदपत्राच्या आधारे बेकायदा व बेकायदेशीररित्या वास्तव्य करणारे बांगलादेशी नागरिक आढळून आल्यास पोलीस प्रशासनाने कठोर कारवाई करावी अशी अपेक्षा शिवसेना माजी जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी व्यक्त केली आहे. तसेच बेकायदेशीररित्या वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांमुळे इतर भारतीय नागरिकांचे रोजगार हिरावले जात असून याचा सर्वात जास्त फटका भारतीय मुस्लिमांना बसत आहे. स्थानिक मुस्लिम नागरिकांनी संशयित बांगलादेशी नागरिकांची माहिती पोलीस प्रशासनाला द्यावी असे आवाहन सुनील खराटे यांनी केले आहे.

### व्यापाऱ्यांना रेकॉर्ड मागितले

अमरावती शहरातील ज्या व्यापाऱ्यांकडे बाहेर राज्यातील कामगार काम करीत आहे. अशा सर्व कामगारांचे रेकॉर्ड व्यापाऱ्यांनी पोलिसांना द्यावे अशी सूचना पोलीस प्रशासनातर्फे करण्यात आली आहे. व्यापाऱ्यांनी आपल्याकडील सर्व कामगारांचे रेकॉर्ड ठेवणे बंधनकारक असून व्यापाऱ्यांनी या संदर्भातील रेकॉर्ड न ठेवल्यास तसेच पोलिसांना सादर न केल्यास व्यापाऱ्यांवर देखील कारवाई करण्यात येईल असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

## पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप येथे

# श्री संत गजानन महाराज पालखी सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती–** विदर्भाचे आराध्य दैवत शेगावचे श्री संत गजानन महाराज यांचा पालखी सोहळा पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप, अमरावती येथे भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. हा सोहळा उन्मेष २०२५ या सांस्कृतिक महोत्सवाच्या शुभारंभाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आला होता.



सोहळ्याची सुरुवात गजानन टाऊनशिप, पोटे पाटील रोड येथील श्री संत गजानन महाराज मंदिरापासून करण्यात आली. पालखीचे व श्रींचे पूजन झाल्यानंतर टाऊनशिप परिसरातून पालखी महाविद्यालयाच्या परिसरात दाखल झाली. पालखीचे पूजन महाविद्यालयाच्या पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, पी. आर. पोटे पाटील फार्मसी महाविद्यालय, पी. आर. पोटे पाटील आर्किटेक्चर महाविद्यालय, पी. आर. पोटे पाटील आयुर्वेदिक महाविद्यालय, पी. आर. पोटे पाटील नर्सिंग महाविद्यालय, पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल, पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयांच्या इमारतीसमोर संस्थेच्या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

सोहळ्याचा मुख्य आकर्षण विद्यार्थ्यांनी सादर केलेले ढोल पथक आणि लेझीमच्या माध्यमातून दाखवलेला उत्साह होता. संस्थेचे अध्यक्ष मा. आमदार प्रविण पोटे पाटील आणि उपाध्यक्ष माननीय श्रेयशदादा पोटे पाटील यांनीही टाळ, मृदुंग व ढोल वाजवत विद्यार्थ्यांसोबत उत्स्फूर्त सहभाग घेतला.

भजन मंडळीयांच्या टाळ, मृदुंग व भजनांच्या निनादाने आणि विद्यार्थ्यांच्या लेझीम प्रदर्शनाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

पालखी सोहळ्याचे उत्कृष्ट नियोजन महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. गौरी देशपांडे, प्रा. अक्षय पुंडकर व विविध विभागांच्या प्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली अथर्व राऊत, आशुतोष शेंडे, वेदांत लव्हाळे, भाग्यश्री अमृतकर, तनवी ठाकरे सलोनी कुरुंबसी, सुहानी जुनघरे या विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम केले.हा सोहळा सांस्कृतिक आणि अध्यात्मिक उत्सवाचा अद्वितीय संगम ठरला.

# सरकारचे संपूर्ण लाभ जनतेपर्यंत पोचविणार!

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा निर्धार

### अमरावतीत अद्ययावत पालकमंत्री कार्यालय– नागपूर, अमरावतीमधील पत्रकारांसाठी निवासस्थाने

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नागपूर–** पालकमंत्री म्हणजे शोभेसारखी वस्तू नसून, सरकार व प्रशासनाचा महत्वाचा दुवा आहे. प्रत्येक व्यक्तीचा पालक असतो. त्यामुळे सरकारचा संपूर्ण लाभ, योजना जनतेपर्यंत पोचविणार, असा निर्धार राज्याचे महसूल मंत्री आणि नागपूर व अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. पत्रकारांना सोबत घेवूनच जनसेवा करू, असे ते म्हणाले.नागपूर प्रेस क्लब आणि नागपूर श्रमिक पत्रकार संघातर्फे आयोजित केलेल्या संवाद कार्यक्रमांत ते बोलत होते. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, माझा दावा नाही की, आम्ही सगळे बदलवू शकतो पण जनतेच्या भावना लक्षात घेवून प्रत्येक प्रश्नाला न्याय देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न नक्की करणार आहे.

आम्हाला इतके मोठे यश मिळाले की त्यामुळे जनतेच्या अपेक्षा वाढल्या. पण आव्हानही मोठी आहेत जनतेच्या प्रश्नाच्या सोडवणुकीला प्राधान्य देवून पुढील वाटचाल करू असे सांगून बावनकुळे म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांच्या रूपाने मजबूत मुख्यमंत्री महाराष्ट्राला लाभले आहेत. जिथे जिथे कुठे कमी पडू तिथे पंतप्रधान नरेंद्र मोदी आमच्या मागे भक्कमपणे उभे आहेत. तसे त्यांनी आमदारांच्या बैठकीमध्ये सांगितले आहे.



**अमरावतीमध्ये पालकमंत्री कार्यालय**

अमरावतीमध्ये पालकमंत्री कार्यालय असणार आहे. शेवटच्या घटकापर्यंत सरकारचा चेहरा नेण्याचे काम करणार आहे. महसूलमंत्री म्हणून पारदर्शीपणे काम करून शेवटच्या व्यक्तीला समाधान मिळेल आणि जनतेची वचनपूर्ती करण्याची जवाबदारी पार पडणार असल्याचे बावनकुळे म्हणाले.

**विकासाची गती विस्तारणार**

विदर्भ, मराठवाड्याच्या विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात प्रयत्न सुरु झाले असून, जनतेने आता निर्धास्त व्हावे, कारण २०१४ ते २०१९ चा विकासाची गती तेज करणारा काळ परत आला असून, देवेंद्र फडणवीस, नितीन गडकरी आणि मी आता विकासाची गती विस्तारणार आहोत, एक एक क्षण हा मला विकासाकरता द्यायचा आहे, असेही बावनकुळे यांनी सांगीतले.

# ६.१४ लाखांची वीज चोरी उघड

## कौशिक अग्रवाल, अनमोल अरोरासह सात जणांविरुध्द गुन्हे दाखल




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती** ९महावितरणच्या भरारी पथकाने शहरात वीज चोरीबाबत धडक कारवाई करीत ६ लाख १४ हजार २५५ रुपयांची वीज चोरी पकडून सात व्यक्तीविरुध्द गुन्हे दाखल केले. दयाराम काशीराम साहू (वय ६२), मनोज दयाराम साहू (दोन्ही रा. बजरंग टेकडी), अमन लक्ष्मणसिंग ठाकूर (वय ४५), कौशिक शिवचरण अग्रवाल (वय ५५ रा. विलासनगर), अब्दुल अनिस अब्दुल गणी (रा. धरमकाटा), मेहमुद अहमद खान शहाबाज (वय ६० रा. कोहीनूर कॉलनी), अनमोल सुरेंद्र अरोरा (वय ३७ रा. दस्तुरनगर) अशी गुन्हे दाखल झालेल्यांची नावे आहेत.महावितरण विभागाचे भरारी पथक शहरात वीज चोरी पकडण्याची मोहिम राबवित होते.

दरम्यान त्यांनी शहरातील वेगवेगळ्या परिसरात जाऊन बीज मीटरची तपासणी केली असता बजरंग टेकडी येथील रहिवाशी दयाराम साहू यांनी घरातील वीज मिटरमध्ये छेडछाड करून १ लाख ५ हजार रुपयांची वीज चोरी केल्याचे स्पष्ट झाले.तसेच अमन ठाकूर व कौशिक अग्रवाल यांनी सुध्दा १ लाख ९ हजार रुपयांची वीज चोरी केल्याचे समोर आले. तसेच अब्दुल अनिस यांनी ७२ हजार ३७० रुपये, मेहमुद अहमद यांनी ४१ हजार ६८० रुपये तर अनमोल अरोरा यांनी तब्बल २ लाख ८६ हजार ६५ रुपयांची वीज चोरी केल्याचे समोर येताच महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्रीकांत पंजाबराव तळेगावकर यांनी बडनेरा ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट ठार

### नागपूर–तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४यवतमाळ** भक्षाच्या शोधात भ्रमंती करीत असलेल्या बिबट्याला नागपूर–तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील कोसदणी घाटात अज्ञात वाहनाने जोदार धडक दिली. या अपघातात बिबट जागीच ठार झाला.ही घटना बुधवारी रात्री साडेदहा वाजताच्या सुमारास आर्णी तालुक्यातील कोसदणी घाटात घडली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांसह वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला व मृत बिबट्याला आर्णी येथील वनपरिक्षेत्र कार्यालयात आणले. उत्तर आर्णी परिक्षेत्रातील लोणबेहळ बिट कक्ष क्रमांक ११ मध्ये अंदाजे चार ते पाच वर्षाचा बिबट भ्रमंती करत होता. तो रस्ता ओलांडत असताना नागपूर–तुळजापूर महामार्गावर अज्ञात वाहनाने त्याला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी जबरदस्त होती की बिबट जागीच ठार झाला. वनअधिकाऱ्यांनी पंचनामा करून मृत बिबट्याचे पार्थिव आर्णी वनपरीखेत्र कार्यालयात पाठविले. नागपूर–तुळजापूर महामार्गावर कोसदणी घाटात यापूर्वीही वन्यप्राण्यांचा अपघातात मृत्यू झाल आहे. येथे रस्त्याच्या दुतर्फा जंगल असल्याने वाघ, बिबट, अस्वल, कोल्हे, हरीण आदी वन्यप्राण्यांचा मोठा वावर आहे. मात्र रात्रीच्या वेळी हे वन्यप्राणी रस्ता ओलांडताना भरधाव वाहनांमुळे ठोकरले जावून मृत्यूमुखी पडत आहेत. समृद्धी महामार्गाप्रमाणे नागपूर–तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर वन्यप्राण्यांच्या येण्या–जाण्याकरीता कॅरिडॉर निर्माण करण्याची मागणी वन्यप्रेमींनी केली आहे.



## एमएच–२७–एटीएस चा अभिनव उपक्रम

# गत १७ वर्षापासून राबवित आहे अनोखा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती** पर्यावरण आणि स्वच्छतेच्या दृष्टीने अडचणीच्या ठरलेल्या मुर्त्या एकत्रित करून झोन कार्यालयापर्यंत पोहचत्या करून देत महाराष्ट्रातील सर्वदूर व सर्वप्रथम राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे असे, प्रतिपादन सहाय्यक आयुक्त दिपीका गायकवाड व भूषण पुसदकर यांनी व्यक्त केले. एमएच–२७–एटीएस ग्रुप्सतर्फे, मनपा आयुक्त तथा प्रशासक यांचे परवानगीने व त्यांच्या मार्गदर्शनात राबविण्यात येत असलेल्या स्वच्छता व पर्यावरण पूरक अशा एका छोटेखानी कार्यक्रमात दोन्ही सहाय्यक आयुक्त बोलत होते. एमएच–२७–एटीएस ग्रुप्सतर्फे गत १७ वर्षापासून दसऱ्याच्या मुहूर्तावर अंबादेवी व एकविरा देवीच्या चरणी अर्पण केले जाणारे ट्रकभर सोने ( आपट्याची पाने ) गोळा करून स्वच्छता अभियान राबविणे, माता महालक्ष्मी, गणेश चतुर्थी उत्सव, नवरात्री महोत्सव यांसह कोणत्याही महाप्रसादाचे वेळी शिल्लक राहणाऱ्या अन्नाची योग्य मार्गाने विल्हेवाट लावणे, कोरोनापासुन मागणीनुसार घरोघरी विनामूल्य स्वरूपात स्प्रे करून देणे, मनपा मधून विनामूल्य दिले जाणारे जन्म मृत्यू दाखले व्यवस्थितरित्या मिळण्याकरिता संबंधितांना सर्वतोपरी विनामूल्य स्वरूपात सहकार्य व मार्गदर्शन करणे, वाहने स्लिप होऊन अपघात घडू नये म्हणून रस्त्याचे टर्निंगवरील चुरी,रेती उचलून टाकणे, असे एक ना अनेक उपक्रमांसह विकासात्मक व सकारात्मक उपक्रमात एमएच–२७– एटीएस ग्रुप्स नेहमीच अग्रेसर राहणे,खरोखर कौतुकास्पद आहे असे मत सहाय्यक आयुक्त भूषण पुसदकर यांनी व्यक्त केले. या अनेक सकारात्मक जनहितकारी उपक्रमास मनपा प्रशासन करित असलेल्या सहकार्याबद्दल अंजली पांडे, छाया किशोर कडू, प्रमोद पांडे, किशोर कडू, चौधरी, गुल्हाने,पाटिल, केने, डाहाने, गुप्ता, धजेकर, पाल, लोखंडे, राऊत, बडगे, महल्ले, गजभिये, भटकर, साहु, निंभोरकर, सराफ, देशमुख, दाते, बडनखे, कदम,बिजवे, जोशी, वाघ,वानखेडे, आगाशे, वऱ्हाडे, गुंबळे, अवसरे, तायडे, दिवाण, देशपांडे, राणे, नाकील, पाठक, पवार, दरणे, घुरडे, गायगोले, यांच्यासह शेकडो नागरिकांनी मनपा आयुक्त आणि प्रशासनाप्रति आभार व्यक्त केले. शहरात वर्षा–नु–वर्षापासुन जागोजागी अस्ताव्यस्त, न बघविणाऱ्या स्थितीत आढळणा ऱ्या मुर्त्यांचे नेमके करायचे काय ? यामुळे, सर्वजण चर्चा आणि विचार करीत असतांना प्रमोद पांडे यांनी पुढाकार घेऊन प्रशासनाला स्वच्छता व पर्यावरणपुरक या उपक्रमाचे महत्व पटवून दिल्यानंतर, गत वर्षीपासून मनपाचे पाचही झोन कार्यालया अंतर्गत,हा उपक्रम सर्वांचे सहकार्यातून राबविण्यात येत आहे. राज्यातील सर्वदूर व सर्वस्तरातून अभिनंदन होत असलेला हा उपक्रम सर्वप्रथम अमरावती मनपा अंतर्गत राबविण्यात येत असल्याबद्दल अमरावतीकर समाधान व्यक्त करीत आहे.यावेळी, क्षेत्रिय अधिकारी देवरणकर, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक भुरे,आदि हजर होते.



# उद्धव ठाकरेंचे महापालिका निवडणुकीसाठी स्वबळाचे संकेत

## भाषणात म्हणाले; यावेळी मला सूड....

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मुंबई–** बाळासाहेब ठाकरेंच्या जयंती निमित्त आज मुंबईत शिवसेना (ठाकरे) पक्षाचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यातून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आगमी महापालिका निवडणुका स्वबळावर लढवण्याचे संकेत दिले आहेत. याबरोबरच ठाकरेंनी भाजपाचे ज्येष्ठ नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना इशारा देखील दिला आहे.आगमी महापालिका निवडणुकां स्वबळावर लढवण्याबद्दल बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, येत्या काही काळात महापालिकेच्या निवडणुका येणार आहेत. मी सगळ्यांशी बोलतो आहे. मुंबई, संभाजीनगर नाशिक सगळ्यांशी बोलून झालं. सगळ्यांचं म्हणणं आहे की एकटं लढा.पुढे बोलताना ठाकरे समोर उपस्थित कार्यकर्त्यांना उद्देशून म्हणाले की,ताकद आहे? अमित शहांना जागा दाखवणार आहात? ठीक आहे अजून निवडणूक जाहीर झाली नाही. तुमची जिद्द, तयारी बघू द्या ज्या भ्रमात आपण राहिलो, त्या भ्रमातून पहिलं बाहेर या.ज्या क्षणी माझी खात्री पटेल की आपली तयारी झाली आहे, मी कार्यकर्त्यांच्या मनाप्रमाणे निर्णय घेतल्याशिवाय राहणार नाही.




पण यावेळी मला सूड उगवून पाहिजे.. सूड, सूड आणि सूड होय सूड जो महाराष्ट्राच्या पाठीत वार करतो. जो मराठी आईच्या कुशीवरती वार करतो तो गद्दार आणि त्या गद्दाराचा वरदहस्त मला महाराष्ट्रात दिसता कामा नये, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.जर तुम्ही सगळे शपथ घेऊन सांगत असाल तर जेव्हा वेळ येईल तेव्हा मी एकटं लढण्याचा निर्णय नक्की घेतल्याशिवाय राहाणार नाही, असेही उद्धव ठाकरे यांनी उपस्थित शिवसैनिकांना सांगितले.अमित शाहांना सांगतो की जास्त आमच्या नादी लागू नका. आज थोडासा ट्रेलर दाखवला आहे. जेवढे अंगावर याल तेवढे वळ घेऊन दिल्लीला परत जाल, असा इशाराही उद्धव ठाकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना यावेळी बोलताना दिला.

# लसणाच्या दरातही घसरण

## प्रतिकिलो दर ६०० वरून २०० रुपयांवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती–** किलोला ६०० रुपयांवर गेलेल्या लसणाचा दर आता २०० रुपयांपर्यंत खाली आल्याने स्वयंपाकघरात पुन्हा लसणाचा ठसका येऊ लागला आहे. लसणाच्या दरात घसरण झाली असली तरी, कांद्याचे दर अद्याप चाळीशीच्या घरातच आहेत. अमरावती च्या ठोक बाजारात लसणाचा क्विंटलचा दर २५ ते ४५ हजारांपर्यंत पोहोचला होता. मात्र, गेल्या १० दिवसांपासून दर उतरू लागले असून, ते १० ते २२ हजार रुपयांपर्यंत खाली आले आहेत.बाजारात गुजरात व मध्य प्रदेशमधून दररोज १०० क्विंटल लसणाची आवक होत आहे. आठवडे बाजार व भाजी मंडईमध्ये २०० रुपयांपर्यंत दर आले असून, पन्नास रुपये पाव किलो दराने किरकोळ विक्रेते लसणाची बाजारात विक्री करत आहेत.



कांद्याची आवक वाढल्यानंतरही कांद्याचे दर मात्र अद्याप चढेच आहेत. हा दर प्रतवारीनुसार किलोला ३० ते ५० रुपये आहे. बाजार समितीच्या ठोक बाजारात बुधवारी ४ हजार ७५७ क्विंटल कांद्याची आवक झाली होती. तर किमान दर एक हजार ते साडेतीन हजार रुपये होता, अशी माहिती बाजार समितीतून देण्यात आली.–

# विद्युत क्षेत्राच्या खासगीकरणाविरोधात देशभरातील संघटना नागपुरात येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नागपूर:–** उत्तरप्रदेश, राजस्थान व चंदीगडमध्ये विद्युत क्षेत्राच्या खासगीकरणाची प्रक्रिया सुरू झाली असून महाराष्ट्रातही याचे संकेत सरकारच्या निर्णयातून मिळत आहे. या विरोधात देशभरातील विद्युत क्षेत्रातील कामगार– अधिकाऱ्यांच्या संघटना एकवटल्या आहेत. त्यापैकी काही संघटनांनी ‘एक है, तो सेफ है’चा नारा देत २३ फेब्रुवारीला नागपुरात एकत्र येऊन देशव्यापी संम्मेलनाचा निर्णय घेतला आहे.

केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने सुधारित विद्युत कायदा सन – २०१४ पासून २०२५ पर्यंत संसदेमध्ये मंजूर करण्याचा प्रयत्न केला. त्याला विविध राज्य सरकारे, आमदार, खासदार, ५०० च्यावर शेतकरी संघटना, वीज कर्मचारी संघटना, भागधारकांनी विरोध केल्यामुळे संसदेमध्ये तो अडला. परंतु सरकारने फ्रेंचाईजी, समांतर वीज वितरणाचा परवाना, ओपन क्सेस, खाजगी भांडवलदारांना कोळसा खदानीच्या जवळ वीज निर्मितीचे प्रकल्प उभारण्याची परवानगी दिली. सध्या उत्तरप्रदेश, राजस्थान व चंदीगड या केंद्रशासित प्रदेशांमध्ये केंद्र सरकारच्या दबावांमुळे तेथील राज्य सरकारने सरकारी वितरण कंपनीच्या खाजगीकरणाची प्रक्रिया सुरू केली. स्थानिक जनता, वीज ग्राहक, वीज कर्मचारी व अभियंते खाजगीकरणाच्या प्रक्रियेला विरोध करीत आहे. तो डावलून सरकारने खाजगीकरणाची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यास सुरुवात केली. ही देशातील सार्वजनिक वितरण, निर्मिती व पारेषण वीज कंपन्यांसाठी धोक्याची घंटा आहे. याविरोधात नॅशनल को–ऑर्डिनेशन कमिटी एम्प्लॉईज अँड इंजिनियर्सची दिल्ली येथे १९ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या बैठक झाली. त्यात वीज कंपन्यांच्या खाजगीकरणाला विरोध करून देशभरात आंदोलनाचा निर्णय झाला.आंदोलनामध्ये ऑल इंडिया फेडरेशन ऑफ इलेक्ट्रिसिटी एम्प्लॉईजला संलग्न असलेल्या देशभरातील सर्व फेडरेशन व संघटनांनी सक्रिय सहभाग नोंदवणार आहे. २३ फेब्रुवारी २०२५ रोजी नॅशनल को–ऑर्डिनेशन कमिटी एम्प्लॉईज अँड इंजिनियर्सच्या वतीने देशातील राष्ट्रीय पातळीवरील कामगार संघटनांच्या पदाधिकाऱ्यांचे राष्ट्रीय संमेलन नागपुरातील ए. बी. बर्धन सभागृह, ४४ किंग्जवे, परवाना भवन येथे आयोजित करण्यात आले आहे. त्यात देशातील व राज्यातील सर्व कामगार संघटनांचे पदाधिकारी व सभासद यांनी सहभागी होणार असल्याची माहिती महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनचे कृष्णा भोयर यांनी दिली.



# आज इंदोर येथे होणार २०२० दिल्ली सिनेमाच्या ट्रेलर रिलीज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४धारणी**

भारतातील पहिला सिंगल शॉट हिंदी सिनेमा २०-२०दिल्ली चा ट्रेलर आज इंदोर च्या सुप्रसिद्ध रणजीत हनुमान मंदिरात मारुतीच्या दर्शनानंतर रिलीज होणार आहे ,या सिनेमाचे गीतकार, दिग्दर्शक व लेखक देवेंद्र मालवीय असून त्यांच्या मेलघाटातील धारणी व मध्य प्रदेशच्या सीमेवर असलेल्या देडतलाई या छोट्याशा गावाशी नातं आहे,




२०२० दिल्ली सिनेमाही भारतातील पहिली सिंगल शॉट सिनेमा असून दिल्ली येथे झालेल्या दंगलीवर आधारित सिनेमा आहे, यात जातीय तणाव राजकीय षडयंत्र आणि विलक्षण परिस्थितीत अडकलेल्या सामान्य नागरिकांच्या समस्यांवर या सिनेमात प्रकाश टाकण्यात आलेला आहे, दिल्लीतील शाहीन बागेतून सुरू झालेल्या सी ए ए चा विरोध त्या काळात नमस्ते ट्रम्प पर्यंत कसा पोहोचला हे सगळे दृश्य या सिनेमा दाखवण्यात आलेले आहे, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प दिल्लीत असताना व दुसरीकडे सूनियोजित पणे दिल्ली शहराला दंगलीच्या आगीत जाळण्याची गोष्ट या सिनेमात दाखवण्यात आली आहेत , या दंगलीत जवळपास ५३ लोकांना आपला जीव गमवावा लागला होता, त्यांची गोष्ट या सिनेमात दाखवण्यात आलेली आहे आणि विशेष गोष्ट म्हणजे हा चित्रपट सिंगल शॉट ने तयार केलेली आहे,या चित्रपटाचे लेखक डायरेक्टर आणि गीतकार देवेंद्र मालवीय असून निर्माता नंदकिशोर मालवीय, अमित मालवीय, तथा श्रीमती आशू देवेंद्र मालवीय आहे ,आणि याचबरोबर चित्रपटात बिजेंद्र काला, समर जयसिंग , सिद्धार्थ भारद्वाज , भूपेश सिंग , चेतन शर्मा ,आकाश अरोरा आणि देवेंद्र मालवीय इत्यादी कलाकार मुख्य भूमिकेत आहेया चित्रपटात व्हीएफएक्स चे काम विसूअल बर्ड्स अँड स्टुडिओ आणि मिडास टच फिल्म यांनी केलेला आहे.सिंगल शॉट तंत्रामध्ये पटकथा, कोरिओग्राफी, अभिनय, लाईटिंग आणि सेट्स यांच्यात अचूक समन्वय असल्याशिवाय हवा तसा शॉट मिळू शकत नाही. इथे चूक लपवण्याची कोणतीही शक्यता नसते. म्हणूनच, सिंगल शॉट फिल्म हे सिनेमाचे एक अनोखे अनुभव आहे, ज्यामध्ये प्रेक्षक स्वतःला त्या फिल्मचा भाग असल्याचा अनुभव घेतात. हे एक अविस्मरणीय सिनेमॅटिक अनुभव आहे.

# बहिरमच्या शंकरपटात बच्चू कडू सुसाट,६.९ सेकंदात अंतर पार

## २१ जानेवारीला १७ जोड्या २२ जानेवारीला १५२ जोड्या हजारोंची उपस्थिती



### मध्य प्रदेश, विदर्भ, मराठवाड्यातून जोड्या

प्रहारतर्फे आयोजित या बैलगाडा शर्यतीत मध्य प्रदेश, विदर्भ व मराठवाड्यातून मोठ्या प्रमाणात बैलजोड्या व त्या हाकण्यासाठी धुरकरी सहभागी झाले होते. बहिरम यात्रेला भेट देणाऱ्या भाविकांच्या हजारोंच्या उपस्थितीने मैदान फुलले होते.

### गोविंदा आणि शिवने केली बच्चू कडूंची साथ

प्रहार संघटनेच्यावतीने बहिरम येथे बैलगाडा शर्यतीत गोविंदा आणि शिव या बैलाजोडीने माजी आमदार बच्चू कडूंची साथ केली. ६.२ सेकंदाचा वेळ घेत बच्चू कडूंनी बाजी मारली. तीच जोडी अन्य धुरकऱ्याने हाकली तेव्हा त्याने ७.२ सेकंद वेळ घेतला.

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४बहीरम**

प्रहार द्वारा आयोजित बहिरम यात्रेतील शंकरपटाची गुरुवारी सांगता झाली. अखेरच्या दिवशी २३ जानेवारीला एकूण २१३ जोड्या सुटल्या. बच्चू कडूंनी ही पटात बैलजोडी हाकली. दोन महिला धुरकऱ्यांनीही या शंकरपटात आपला सहभाग नोंदविला, वायुवेगाने धावणाऱ्या या बैलजोड्यांनी आपल्या नावावर विक्रम नोंदवित शेतकऱ्यांसह प्रेक्षकांच्या डोळ्याचे पारणे फेडले.

विदर्भातील सर्वात मोठ्या बहिरम यात्रेनिमित्त बैलगाडा शर्यतीचे आयोजन माजी मंत्री बच्चू कडू यांनी केले होते.उपस्थित हजारो लोकांना बच्चू कडू यांनीसंबोधित केले. ही ५६ इंचाची नाही, तर शेतकऱ्यांच्या मुलाची छाती आहे. हम चलते तो चिता की रफ्तार से चलतेरोकने की तुम्हारी औकात नहीं थी. तुम्ही बेइमानी केली म्हणून मी हरलो. हे मतांचे चौर आहेत, पण बच्चू कडू थांबत नाही. आणखी ताकदीने आम्ही धावणार,शेतकरी, शेतमजुरांसाठी आम्ही लढतोय. माझ्या शरीरातील रक्ताचा प्रत्येक थेंबा शेतकऱ्यांसाठी आहे, असे बच्चू कडू यावेळी म्हणाले.

# अमरावती बाजार समितीचे तीन वर्षांचे रि-ऑडिट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**




स्थानिक बाजार समितीच्या गैरकारभाराबाबत सहकारी शेतकरी खरेदी-विक्री समिती व संचालक रेवसा येथील नीलेश महल्ले यांनी १३ जानेवारी रोजी उपनिबंधकांना चौकशी करण्याविषयी तक्रार वजा पत्र दिले होते. मात्र, चौकशी लागलेली नव्हती. परंतु हा मुद्दा प्रसार माध्यमामध्ये प्रकाशित होताच याचीपणन संचालनालयाने दखल घेतली असून २२ जानेवारी रोजी उपनिबंधकांना सन २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण वर्ग १ च्या मार्फत करण्याचे आदेश दिल्याचे पत्र प्राप्त झाले आहे.सुरक्षारक्षकांच्या भविष्य निर्वाह निधीचा भरणा, कंमनीसुरक्षारक्षकांना देत असलेल्या वेतनाची बँकेच्या विवरणासह चौकशी करावी. बाजार समितीत नियुक्त हंगामी कर्मचाऱ्यांपैकी ५० टक्के कर्मचारी कामावर नसून त्यांचे महिन्याचे वेतन नगदी स्वरूपात देण्यात येत असल्याचा आरोप तक्रारीत नमूद होता.

**आदेशात काय म्हटले आहे?**

अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ या कालावधीतील फेरलेखापरीक्षण करणेसाठी एस. एस. पांडे विशेष लेखापरीक्षक वर्ग १, सहकारी संस्था (साखर) अमरावती यांची नियुक्ती करण्यात आल्याचे आदेशात म्हटले आहे.

# अमरावती तालुकास्तर कर्मचारी क्रीडा सांस्कृतिक कार्यक्रमाला प्रतिसाद

## अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांचा सहभाग, सांघिक व वैयक्तिक संघाची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**



अमरावती पंचायत समिती अंतर्गत तालुकास्तरीय अधिकारी, कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव बुधवारी खेळाडूंच्या उत्स्फूर्त सहभागाने उत्साहात साजरा झाला. सांस्कृतिक कार्यक्रमात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संगीताच्या तालावर नृत्य करत धमाल उडवली. तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेतील विजयी संघ व खेळाडू जिल्हास्तरीय क्रीडा महोत्सवात सहभागी होणार आहे. हा जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव ३० जानेवारीपासून सुरू होत आहे.

या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन बीडीओ सुदर्शन तुपे यांनी केले. सहायक बीडीओ अंकिता लाड, गटशिक्षणाधिकारी धनंजय वानखडे, शिक्षण विस्तार अधिकारी संदीप बोडखे, सुधीर खोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हा परिषद माजी शासकीय उर्दू मुलींची शाळा, कॅम्प अमरावती येथे क्रीडा स्पर्धेचे तर सांस्कृतिक कार्यक्रमाचे जिल्हा परिषद माजी शासकीय मराठी मुलींची शाळा, कॅम्प अमरावती येथे आयोजन करण्यात आले होते. अमरावती पंचायत समिती अंतर्गत शिक्षण, आरोग्य, पशुवैद्यकीय, कृषी, पंचायत, गटसाधन केंद्र विभागातील अधिकारी व कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात सहभागी झाले होते.

सांघिक खेळात कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, टेनिक्कॉइट दुहेरी, बॅडमिंटन दुहेरी, रिले, वैयक्तिक खेळात धावणे, लांब व उंच उडी, कुस्ती, गोळा फेक, टेनिक्कॉइट, बुद्धिबळ या खेळाचा समावेश होता. या क्रीडा महोत्सवात केंद्र प्रमुख मोहन जाधव, संजय कोकाटे, सुमती देखणे, स्मृती बाबरेकर, अनिल डाखोडे, नंदकुमार झाकर्डे, सुभाष सहारे, इक्बाल पटेल, संध्या राठोड, सुरेंद्र मेटे, रा. ना. गावंडे, राजेंद्र दीक्षित, रामेश्वर स्वर्गीय, विनायक लकडे यांच्यासह विविध अधिकारी, कर्मचाऱ्यांसह विविध शिक्षक संघटनेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, विषय साधन व्यक्ती, विशेष शिक्षक यांनी सहभाग घेतला होता.

३० जानेवारी ते २ फेब्रुवारीपर्यंत जिल्हास्तरीय अधिकारी व कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केले आहे. या महोत्सवात जिल्ह्यातील विविध तालुक्यातील सांघिक व वैयक्तिक स्पर्धेतील विजयी खेळाडू सहभागी होणार आहेत.

संगीताच्या तालावर थिरकले अधिकारी, कर्मचारी तालुकास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रमात अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला. कराओके गीत, युगल गीत, समूह नृत्य, एकल नृत्य, नाटिका अशा कार्यक्रमातून अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पाय संगीताच्या तालावर थिरकले. सर्वांनी या सांस्कृतिक महोत्सवाचा मनसोक्त आनंद घेतला.

# नगरपालिका प्रशासनाविरोधात जनतेचा रोष : एकाच दिवशी विविध मागण्यांसाठी दोन वेगवेगळे उपोषण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अंजनगावसुर्जी**



अंजनगावसुर्जी नगरपालिकेच्या प्रशासक काळात शहरातील व्यवस्थाच विस्कळीत झाली आहे. एकाच वेळी वेगवेगळ्या मागण्यांसाठी नगरपरिषदेसमोर दोन उपोषणे सुरू असल्याने नागरिकांच्या मनात प्रशासनाविरोधात प्रचंड रोष असल्याचे दिसून येत आहे.

शहरातील वीस वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या सहारानगरातील नागरिक आम्हाला मूलभूत सुविधा पुरवा, यासाठी उपोषणाला बसले. सहारानगरात नाल्या नसल्यामुळे सांडपाणी जाण्यास मार्ग नाही. पथदिवेसुद्धा नाही. रस्त्याची अवस्था प्रचंड बिकट झाली असल्याने वाहनांचा अपघात होत आहे. पिण्याच्या पाण्याची सुद्धा सोय नाही. त्यामुळे त्रस्त नागरिक २०१८ पासून प्रशासनाकडे पाठपुरावा करीत आहेत. परंतु प्रशासनाला जाग येत नाही. उपोषणाचा ईशारा दिल्यानंतर नाली व पथदिव्यांचे काम केले, परंतु तेही निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप सहारानगरातील नागरिकांनी केला आहे. नगरातील नागरिक आशिष तोडे, अतुल चव्हाण, सतवीरसिंग शेखावत, योगेश सावे, प्रभुदास चव्हाण उपोषणाला बसले आहेत. तर त्यांच्यासोबत नगरातील नागरिक प्रभाकर भोसले, काशीराम चव्हाण, वृषभ प्रजापती, अतुल तोडे, गंगाधर झगडे, रोहित झगडे, अर्णव चव्हाण, प्रल्हाद लहाने, संजय हाडोळे,पाटमासे, संजय देशमुख उपोषण मंत्रात उपस्थित होते.

तर दुसरीकडे गेल्या चार वर्षांतील प्रशासकीय काळात झालेल्या शहरातील आरोग्यदायी व विकासात्माक कामांसाठी उच्चस्तरीय चौकशी नेमूण केलेल्या कामाचे ऑडिट करण्यात यावे, यासाठी श्रीकांत नाथे हे उपोषणाला बसले. डॉ. विलास कविटकर, मनोहर मुरकुटे, विक्रम पाठक, मनीष मेन, परमेश्वर श्रीवास्तव, राजेंद्र रेखाते, बाळू तायडे, विकास रावळे यांनी उपोषण मंडपाला भेट दिली. दोन दिवसांनंतर प्रजासत्ताकदिन असल्याने पालिका प्रशासन उपोषणकर्त्यांचे काय समाधान करते, याकडे लक्ष लागले असून पालिका प्रशासनाविरोधात मात्र नागरिकांचा रोष दिसून येत आहे.

# वाहतूक अंमलदाराशी हुज्जत; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल : तिवसा ठाण्याच्या हद्दीतील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ तिवसा**

वाहतूक अंमलदाराशी हुज्जत घालून शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनचालकासह तिघांविरुद्ध बुधवार, २२ जानेवारी तिवसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही घटना मंगळवार, २१ जानेवारी रोजी घडली.

तिवसा येथील वाहतूक अंमलदार हे मंगळवारी त्यांचे कर्तव्य बजावत होते. त्यावेळी नागपूर-अमरावती महामार्गावर चारचाकी वाहन क्रमांक एमपी ६८ झेडडी २२०५ हे त्यांच्या दृष्टीस पडले. त्या वाहनाच्या वरचे बाजूला कॅरियर लावून व वाहनाच्या नियमित रचनेत फेरबदल करून माल, लगेज वाहून वेगाने जात असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे त्यांनी ते वाहन थांबवून चालकास परवान्याबाबत विचारणा केली. त्यावेळी वाहनचालकाने वाहतूक अंमलदारांसोबत वाद घातला. उद्धटपणे तुम्ही आमचे गाडीचे चालान काटल्यास जिवाने मारून टाकू, अशी धमकी देत त्याने त्यांचा मोबाइल हिसकाविला. तसेच शिवीगाळ काज शासकीय कामात अडथळा निर्माण केला. या प्रकरणी वाहतूक अंमलदार यांच्या तक्रारीवरून वाहन चालक अमन अजयकुमार यादव (३२), अजय हिरालाल यादव व सोबतची एक महिला सर्व रा. हरनामसिंगनगर, बऱ्हाणपूर, मध्यप्रदेश यांच्याविरुद्ध गुनहा दाखल करण्यात आला.

# मंगरूळ चव्हाळानगरीत बालसाहित्य संमेलनास प्रारंभ प्रश्नचिन्ह आदिवासी आश्रम शाळेतून काढली ग्रंथदिंडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मंगरूळ चव्हाळा**



आदिवासी फासेपारधी सुधार समिती मंगरूळ चव्हाळा संचालित प्रश्नचिन्ह आदिवासी आश्रम शाळेत दोन दिवसीय बालसाहित्य संमेलनाचे उद्घाटन आदिवासी विकास विभाग, अमरावतीचे अप्पर आयुक्त जितेंद्र चौधरी यांच्या हस्ते झाले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष कवी अनंत राऊत हे होते. दरम्यान उद्‌घाटनापूर्वी गावातून ग्रंथदिंडी काढण्यात आली होती.

यावेळी आ. प्रताप अडसड, आ. राजू तोडसाम, आरडीसी अनिल भटकर, शाळेचे अध्यक्ष मतीन भोसले, कवी नितीन वरणकर, ज्ञानेश्वर रक्षक, संजय कावरे, अजय कोळी, सुधीर तायडे, गजानन नारे, परसराम भोसले, अविनाश मारशिटीवर, सरपंच राजेश पारधी, दिनकर तायडे यांच्यासह सामाजिक क्षेत्रातील विविध पदाधिकारी उपस्थित होते. या संमेलनानिमित्त मंगरूळ चव्हाळा गावात काढलेल्या ग्रंथ दिंडीचे गावात स्वागत केले. या साहित्य संमेलनात वेगवेगळ्या सत्रात कविता, कथाकथन, परिसंवाद, नाट्याविष्कार यामध्ये राज्यातील विद्यार्थी सहभागी झाले आहे. प्रास्ताविक भाषण मतीन भोसले यांनी केले. सूत्रसंचालन शिक्षक अजय काळबांडे यांनी केले.

# ठाकरे म्हणाले, बळ वाढवा! नेते म्हणतात, हस्तक्षेप थांबवा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २४ मुंबई**

कार्यकर्त्यांच्या इच्छेप्रमाणे निर्णय होईल, असं म्हणत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढण्याचे संकेत शिवसेना उबाठाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी काल पक्षाच्या मेळाव्यात दिले. तुमची लढायची असेल तर कार्यकर्त्यांच्या इच्छेनुसार निर्णय घेऊ, अशा शब्दांत ठाकरेंनी काल अंधेरीतील मेळाव्यात एकला चलो रेचे संकेत दिले. त्यानंतर आज त्यांनी शिवसेना भवनात जिल्हाप्रमुख, संपर्कप्रमुखांची बैठक बोलावली. त्यात ठाकरेंनी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केलं.

राज्यभरात पक्षाचं बळ दाखवा. ग्रामीण भागात पक्षाची ताकद वाढवा. मग स्वबळाचा निर्णय घेऊ, असं उद्धव ठाकरे जिल्हाप्रमुख, संपर्कप्रमुखांना संबोधित करताना म्हणाले. त्यावर स्थानिक नेतृत्त्वाला अधिक सक्षम करणं गरजेचं असल्याची भूमिका नेत्यांनी मांडली. काल झालेल्या मेळाव्यानंतर ठाकरेंनी शिवसेना भवनात महत्त्वाची बैठक बोलावली होती.

ग्रामीण भागात पक्ष वाढवा. पक्षाचं बळ दाखवा. त्यानंतर तयारी आणि परिस्थिती पाहून स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला जाईल, असं उद्धव ठाकरेंकडून जिल्हाप्रमुख, संपर्कप्रमुखांना सांगण्यात आलं. त्यावर ठाकरेंच्या काही नेत्यांनी भूमिका मांडली. त्यांनी काही सूचना केल्या. मुंबईतील काही संपर्कप्रमुख ग्रामीण भागात जाऊन काही सूचना करतात, निर्णय घेतात. त्यांचा अवाजवी हस्तक्षेप कमी करायला हवा, अशा सूचना नेत्यांकडून करण्यात आली.

# सायन्सकोर मैदानात मिनी सरस प्रदर्शनीच थाटात उद्घाटन .....

## २४ ते २८ जानेवारीपर्यंत अमरावतीकरांच्या सेवेत







ग्रामीण भागातील स्वयं सहाय्यता समूहातील महिलांचे जीवनमान उंचावणे, त्यांचे सबलीकरण करणे व उपजीविका आधारित उपक्रम राबविणे यासाठी उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून स्वयं सहाय्यता समूहाने उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी दि. २४ ते २८ जानेवारी २०२५ दरम्यान विक्री प्रदर्शनीचे आयोजन मुख्य बस स्थानक समोर, सायन्स स्कोर मैदान, अमरावती येथे आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनीमध्ये अमरावती जिल्ह्यातील ६० स्वयं सहाय्यता समूह तसेच इतर जिल्ह्यातील १० स्वयं सहाय्यता समूह असे एकूण ७५ समूहाचे स्टॉल्स लावण्यात आले आहेत. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र आमदार राजेश वानखडे आमदार प्रवीण तायडे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

# गणतंत्र दिनी खासदार निधीतून थ्री व्हीलर गाड्यांचे होणार वितरण

## डॉ.अनिल बोंडे यांचे दिव्यांगांना सक्षम करण्यासाठी मोठे पाऊल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

दिव्यांगांना सक्षम करण्यासाठी राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी मोठे पाऊल उचलले आहे. गणतंत्र दिनी अर्थात २६ जानेवारी रोजी ५२ दिव्यांग बांधवांना थ्री व्हीलर गाड्यांचे वितरण गणतंत्र दिनाच्या मुख्य कार्यक्रमाचे अतिथी असलेले राज्यमंत्री इंद्रणील नाईक यांच्यासह जिल्हा प्रशासनातल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हस्ते हे वितरण होणार आहे. या वितरणानंतर अमरावती शहरातून भव्य रॅली काढली जाणार आहे. या रॅलीत अमरावती करांनी सहभागी व्हावे असे आव्हान डॉ. अनिल बोंडे यांनी केले आहे.



राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी दिव्यांगांना सक्षम करण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. दिव्यांगांना मदत म्हणून त्यांनी आपल्या खासदार निधीतून ५२ थ्री व्थीव्हीलर गाड्या दिव्यांगांना वितरित करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या कार्यक्रमाचा शुभारंभ २६ जानेवारी रोजी सकाळी विभागीय क्रीडा संकुल येथून होणार आहे. गणतंत्र दिनाच्या कार्यक्रमात मुख्य अतिथी असलेले राज्यमंत्री इंद्रनील नाईक प्र.विभागीय आयुक्त तथा जिल्हाधिकारी सौरभ कटियार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्रा, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस अधीक्षक विशाल आनंद, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या हस्ते दिव्यांगांना या थ्री व्हीलर गाड्या दिल्या जाणार आहेत. त्यानंतर अमरावती शहरातून दिव्यांगांची भव्य रॅली काढली जाणार आहे. दिव्यांगांना सक्षम करण्यासाठी डॉ.अनिल बोंडे यांनी उचललेले हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. दिव्यांगांना पाठबळ देण्यासाठी व त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी अमरावतीकरांनी या रॅलीत सहभागी व्हावे असे आवाहन डॉ.अनिल बोंडे यांनी केले आहे.

# राज्यस्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शनाला २८ जानेवरीला प्रारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन आणि राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ५२ व्या राज्यस्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शन २०२४-२५ चे आयोजन दिनांक २८ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे होणार आहे. कार्यक्रमाचे उदघाटन बुधवार, दि.२९ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

यावर्षी हे प्रदर्शन अमरावती जिल्ह्याने आयोजित केले असून, राज्यातील सर्व जिल्ह्यातून ८०० विद्यार्थी आणि शिक्षक या प्रदर्शनात सहभागी होणार आहेत. तसेच, शिक्षण मंत्री महोदयांच्या सूचनेनुसार, प्रत्येक जिल्ह्यातून दररोज हजार विद्यार्थी आणि शिक्षक या प्रदर्शनास भेट देणार आहेत. विद्यार्थी, शिक्षक आपल्या वैज्ञानिक प्रतिकृती, नवनिर्मितीचे प्रदर्शन यावेळी घडविणार आहे. यासाठी शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, नागरिक यांनी प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन राज्य विज्ञान शिक्षण संस्थेच्या संचालक डॉ. हर्षलता बुराडे यांनी केले आहे.

# आदिवासी महिला राज्यपालांना 'कास्ट व्हॅलिडिटी' परत करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

शासकीय सेवेत अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा लाभ गेल्या २५ वर्षांपासून मिळत नसल्यामुळे पुणेजिल्हा परिषदेतील अनुसूचित जमातीच्या महिला कर्मचारी सुरेखा तारडे या २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनी स्वतःचे जातवैधता प्रमाणपत्र आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यामार्फत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे परत करणार आहेत. या प्रकाराने एकच खळबळ उडाली आहे.



पुणे येथील विभागीय आयुक्तांनी १०० बिंदुनामावलीनुसार रोस्टर तपासणीच केली नाही. प्रशासन विभागातील कर्मचाऱ्यांनी आदिवासी आरक्षणाचा लाभ घेतला, स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झाले असले, तरी बनावट जातप्रमाणपत्र सादर करून आरक्षणाचा लाभ घेतला. तरीही आरक्षणाचा लाभच घेतला नाही, असे लेखी लिहून देऊन पुन्हा पदोन्नती मिळवली. त्यामुळे मागील २५ वर्षांपासून तारडे यांच्यावर अन्याय झालेला असल्यामुळे त्यांना अनुसूचित जमाती आरक्षणाचा लाभच मिळालेला नाही. सन १९९९ मधील त्यांच्याच आदेशातील अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर नियुक्ती मिळवलेल्या बिगर आदिवासी कर्मचाऱ्यांना तीनवेळा बढती देण्यात आली. परंतु, मुळातच घटनात्मक हक्काच्या राखीव जागा असतानासुद्धा तारडे यांना बढतीपासून वंचित ठेवण्यात आले आहे.

पुणे जिल्हा परिषदेत जातवैधता प्रमाणपत्र नसतानाही अनेक मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना वरिष्ठ सहायक, अधीक्षक व कक्ष अधिकारी या पदांवर पदोन्नती दिलेल्या आहेत. हा गोरखधंदा सन २००९ पर्यंत चालूच होता. शासन निर्णय १८ ऑक्टोबर १९९७ नुसार नेमणूक अथवा पदोन्नती करण्यापूर्वी सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), पुणे यांच्याकडून १०० बिंदुनामावली तपासणी करणे बंधनकारक होते. परंतु, तसे न करता प्रथम नेमणूक व पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करून घेतली. आरक्षणानुसार बिंदुवरून न घेता नेमणुकीनुसार अनुक्रमांकाने नोंदणी केलेल्या आहेत.

# विद्यापीठ उपयोजित परमाणू विभागातील प्रा. डॉ. दारासिंह सोळंके यांच्या संशोधनाला आठ पेटेंट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उपयोजित परमाणू विभागातील प्रा. डॉ. दारासिंह सोळंके यांच्या विविध विषयांवरील संशोधनाला भारत सरकारच्या पेटेंट कार्यालयाने आठ पेटेंट मंजूर केले आहे.



'इंटेलिजन्ट यूव्ही सेन्सर डिव्हाईस', 'डिझाईन अ‍ॅन्ड डेव्हलपमेंट ऑफ लो - कॉस्ट एम्बडेड सिस्टिम फॉर ऑटोमॅटिक स्पीड कन्ट्रोल ऑफ डीसी मोटर युसिंग डिप लर्निंग अ‍ॅप्रोच', 'रोड सरफेस इरेगुलेरिटिज', 'ऑब्जेक्ट डिटेक्शन अ‍ॅन्ड इमेज क्लासिफिकेशन युझिंग डिप लर्निंग अ‍ॅल्गोरिथमस्', 'अ‍ॅप्लिकेशन ऑफ सपोर्ट वेक्टर मशिन मॉडेल्स फॉर फोरकॉस्टग सोलर अ‍ॅन्ड वाईन्ड एनर्जी रिसोर्स', 'ए.आय. बेस्ड फेस रिडिंग डिव्हाईस, ए.आय. बेस्ड ऑटोमॅटिक रोबोटिक वेस्ट बिन', 'आय.ओ.टी. बेस्ड ऑटोमॅटिक ब्रोकिंग सिस्टिम', 'ऑटोमॅटिक ब्रोकिंग मेकॅनिझम फॉर व्हेइकल्स बेस्ट ऑन आय.ओ.टी. सेन्सर नेटवक्र्स' अशा आठ संशोधनासाठी प्रा. दारासिंह सोळंके यांना पेटेंट मंजूर करण्यात आले आहेत.

तर 'डेव्हलपमेंट अ‍ॅन्ड अ‍ॅनॉलिसिस ऑफ लो कॉस्ट एम्बेडेड सिस्टिम फॉर व्हेईकल स्पीड डिटेक्शन अ‍ॅन्ड रोड सरफेस इरेग्युलॅरिटीज फॉर ऑटोमॅटिक ब्रोकिंग सिस्टिम' आणि 'ऑन दी पेरेनिअल इमेज क्लासिफिकेशन युसिंग अ‍ॅडव्हॉन्स डीप लर्निंग अ‍ॅप्रोच' या संशोधनासाठी कॉपिराईट मिळाले असून त्यांचे एम.एस्सी. अप्लाईड इलेक्ट्रॉनिक्स अभ्यासक्रमासाठी चार पुस्तके प्रकाशित झाली आहेत आणि कॉपीराईटच्या या विविध पेटेंट्सचा उपयोग अत्यंत धोकादायक वातावरणामध्ये वापरात येणा-या स्वयंचलित वाहनांमध्ये आणि शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रामध्ये होणार आहे. या कार्यामध्ये त्यांना त्यांचे संशोधक मार्गदर्शक प्राचार्य डॉ. योगेंद्र मांडोळे, प्राचार्य आदर्श विज्ञान महाविद्यालय, धामणगांव त्यांच्या विभागप्रमुख डॉ. सुजाता काळे, सहकारी शिक्षक मित्रांचा सहयोग लाभला आहे. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी प्रा. दारासिंह सोळंके यांचे अभिनंदन केले आहे.

# घर घर संविधान अंतर्गत समाज कल्याण विभागाचा उपक्रम

## संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन, बाईक रॅली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ पासून 'घर घर संविधान' उपक्रम सामाजिक न्याय विभागाच्या वतीने राज्यभर राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत आज सकाळी इर्विन चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी पुष्पहार अर्पण करून व अभिवादन केले. सर्व मान्यवर व उपस्थितांनी यावेळी संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन केले. तसेच उपस्थितांना राष्ट्रीय मतदार दिनाची शपथ देण्यात आली.



मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्र, मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, पोलीस उपायुक्त सागर पाटील, समाज कल्याणचे प्रादेशिक उपायुक्त सुनील वारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस, सहायक आयुक्त समाज कल्याण राजेंद्र जाधवर तसेच विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

घर घर संविधान दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय, महानगरपालिका, जिल्हा परिषद, समाज कल्याण विभाग व अन्य शासकीय विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या बाईक रॅलीचे यावेळी आयोजन करण्यात आले होते. मान्यवरांनी हवेत फुगे सोडून रॅलीला सुरवात करण्यात आली.

भारतीय राज्यघटने बाबत जागरूकता तसेच संविधानाची मूल्य शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच देशाचे भावी नागरिक यांच्यापर्यंत पोहोचावीत, यासाठी राज्यातील प्राथमिक, माध्यमिक सर्व प्रकारचे व्यावसायिक, बिगर व्यावसायिक महाविद्यालय, शैक्षणिक संकुले, शासकीय वसतिगृह, निवासी शाळा ,शासन मान्यता प्राप्त अनुदानित, अनुदानित, स्वयंअर्थ सहाय्य, आश्रमशाळा, शासकीय वसतिगृह तसेच ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्था, महाराष्ट्र विधान परिषद, विधानसभा अशा सर्व ठिकाणी घर घर संविधान हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

बाईक रॅलीच्या समारोप प्रसंगी संविधान मसुदा समितीचे सदस्य डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात केले.यावेळी राष्ट्रगीताने या कार्यक्रमाचे सांगता झाली. कार्यक्रमाचे संचालन श्रीकृष्ण पखाले यांनी तर आभार समाज कल्याण सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी मानले.

# मंत्रालयासमोर तरुणाचं झाडावर चढून आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २४ मुंबई**

मंत्रालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर असलेल्या झाडावर चढून एका तरुणानं आंदोलन सुरु केलं. ग्रामीण भागातून आलेला तरुण झाडावर चढल्यानंतर पोलिसांची तारांबळ उडाली. अग्निशमन दलाच्या जवानांना मंत्रालयाच्या बाहेर पाचारण करण्यात आलं. त्यांनी खाली जाळी धरली. दरम्यान पोलिसांकडून त्याला सातत्यानं खाली येण्याची विनंती करण्यात येत होती. अखेर १५ ते २० मिनिटांनी तो खाली उतरला.


मंत्रालय आणि त्याच्या आसपास मोठा पोलीस बंदोबस्त तैनात असतो. या भागातील सुरक्षा व्यवस्था अतिशय चोख असते. अशा परिस्थितीत तरुण झाडावर चढून आंदोलन करु लागल्यानं आश्चर्य व्यक्त करण्यात आलं. पोलीस अधिकाऱ्यांनी त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण तो ऐकत नव्हता. 'तू खाली ये. आम्ही संबंधित अधिकाऱ्यांना तुझी भेट घडवतो. तुझा प्रश्न मार्गी लावतो,' असं पोलीस अधिकारी खालून ओरडत होते. पण तरुण बराच वेळ झाडावरच बसून होता.

झाडावर बसलेला तरुण त्याचा प्रश्न सांगत होता. पण तो उंचावर असल्यानं त्याचा आवाज नीटसा ऐकू येत नव्हता. 'ग्राम पंचायतीत भ्रष्टाचार झालेला आहे. त्यातील दोषींवर कारवाई व्हावी यासाठी मी पंचायत समिती, जिल्हा परिषदेकडे गेलो. पण मला न्याय मिळाला नाही. मला न्याय हवा आहे,' असं हा तरुण ओरडून ओरडून सांगत होता.

# मोर्शी शहरात युवकाची दगडाने ठेचून निर्घृण हत्या, शेतात सापडला नग्नावस्थेत मृतदेह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ मोर्शी**

मोर्शी शहरात एका युवकाची दगडाने ठेचून निर्घृण हत्या केल्याची घटना गुरुवारी सकाळी ७ वाजताचे सुमारास उघडकीस आली. मोर्शी ते अमरावती मार्गावर येरला गावाजवळ असलेल्या शिरभाते मंगल कार्यालयाजवळ ही घटना घडली. मृत तरुणाचं नाव सुनील अनंत चवरे, वय ९ वर्ष आहे.



तरुण युवकाचा मृतदेह शेताच्या काटेरी कुंपणात नग्नावस्थेत आणि डोक्यावर प्रहार करण्यात आलेला मोठा दगड रक्ताने माखलेल्या अवस्थेत आढळून आला. घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर, अमरावती येथील ग्रामीण पोलीस, अमरावती स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. मोर्शीचे ठाणेदार नितीन देशमुख यांच्या नेतृत्वात मोर्शी पोलिसांचा ताफा घटनस्थळी तैनात करण्यात आला. श्वानपथक आणि मोबाईल युनिट तसंच उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रमोद पोतदार यांनासुद्धा या ठिकाणी पाचारण करण्यात आलं.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार मोर्शी शहरातील श्रीकृष्ण पेठ येथील अरविंद रवाळे यांचे घरी अनंत चवरे हे पत्नी आणि आपल्या दोन मुलांसह गेल्या आठ ते दहा वर्षापासून भाड्याने राहात आहेत. २३ जानेवारी रोजी संध्याकाळी दहा वाजण्याच्या सुमारास मृतक सुनील चवरे याने आपले वडील अनंत यांच्याकडे अंगातील जर्किन काढून दिले होते. त्यावेळी त्याच्या मोबाईलवर फोन येत असताना तो घरून सिंभोरा चौकातून येतो, म्हणून सांगून गेला. मात्र तो रात्री घरी परत आला नसल्यामुळे अनंत चवरे आणि त्यांच्या पत्नी यांनी मोर्शी पोलीस ठाण्यात धाव घेऊन मुलगा घरी परत आला नसल्याची तक्रार दिली होती.